नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष १६ * अंक ९९ * * गडचिरोली * बुधवार, दिनांक १३ ऑगस्ट २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त




## कारवर दगड पडला, ६ ठार

■ **वृत्तसंस्था, लडाख, दि. १२ :** लडाखमधील सरचू भागात मनाली-लेह महामार्गावर सोमवारी झालेल्या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला, तर दोन जण जखमी झाले.

जखमींना २ हेलिकॉप्टरने वाचवण्यात आले आणि लेहला पाठवण्यात आले. लष्कराने घटनास्थळी पोहोचून जखमींना प्राथमिक उपचार दिले आणि त्यांना एअरलिफ्ट करण्यात मदत केली. लेह-लडाख रस्त्यावर अचानक एक मोठा दगड टेकडीवरून खाली कोसळला आणि कारवर आदळला. टक्कर इतकी जोरदार होती की कारचा तोल गेला आणि ती दुसऱ्या बाजूला असलेल्या टेकडीवर आदळली.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## १५ हजारांनी काय होणार?

महाराष्ट्र सरकारने पोलीस दलामध्ये 15 हजारांची पोलीस भरती करणार असे जाहीर केलेले आहे ही अत्यंत आनंदाची बाब आहे. परंतु संपूर्ण पोलीस खात्यात ही भरती अत्यंत कमी पडेल असे नमूद करावेसे वाटते कारण सध्या १५००० पोलीस केवळ वाहतूक विभागाच्या विभागासाठीही कमी पडतील अशी परिस्थिती आहे. आपल्या राज्यातील पोलीस दलाला इतर अनेक आघाड्यांवर काम करावे लागते, राज्यातील वाहतुकीचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. गुन्हेगारी वेगाने वाढत आहे, अगदी किडे, मकोडे किंवा मुंग्या मारल्यासारखे खून पडत आहेत. पोलिसांची जबाबदारी आहे हे मान्य आहे. मात्र त्याच पोलिसांना जबाबदारीची इतकी कामे आहेत की त्यासाठी १५००० पोलीस म्हणजे मुंबई शेजारच्या अरबी समुद्रामध्ये १०० ग्रॅम खसखस टाकण्यासारखे आहे. आपल्या राज्यामध्ये लोकसंख्या ज्या प्रमाणात वाढलेली आहे त्या प्रमाणात पोलिसांची भरती करण्यात आलेली नाही. इतर सरकारी कामासाठी ठेकेदारांकडून करारावर माणसे आणता येतात. मात्र पोलीस खाते हा एकमेव विभाग असा आहे की 'तिथे पाहिजे जातीचे, येऱ्या गबाळ्याचे काम नोहे' अशी परिस्थिती आहे. राज्यातील प्रत्येक जिल्हा आणि तालुक्यामध्ये वाहतूक शाखा आहे. तिथेही वाहतुकीचे अनेक प्रश्न आहेत म्हणजेच आजकाल सर्वाधिक मोठी समस्या कोणती असेल तर ती वाहतुकीची आहे. याशिवाय आपल्या राज्यातील वाहन चालवणाऱ्या लोकांची मानसिकता अशी काही झालेली आहे की, शिस्त पाळणे म्हणजे आपली बदनामी आहे, अपमान आहे किंवा बरबादी आहे असेच प्रत्येकाला वाटते. आम्ही वाहतूक विभागाचा खास उल्लेख यासाठीच केला आहे की या विभागावर फारच मोठी जबाबदारी आहे. वाहतूक शाखेमध्ये काम करणाऱ्या पोलिसांना सातत्याने उभे राहून काम करावे लागते. तरीही कोणत्याही शहरात गेल्यावर महाराष्ट्रातील वाहतूक विभागाच्या सेवेमध्ये जे पोलीस आहेत त्यांचे काम वाहतूक शिस्त कशी राहील. हे पाहण्याचे आहे पण त्या पलीकडे वाहन चालक आणि म्हणजे जनतेने चुका कराव्यात आणि आपण त्याचे फोटो काढून सरकारच्या कमाईत भर टाकावी हेच आहे काय. मोठ्या शहरात हे प्रमाण बरेच मोठे आहे, यातील म्हणजे वाहतूक विभागातील शिपायांना सतत उभे राहून काम करावे लागते, थोडेसे अपवाद वगळले तर मोठ्या प्रमाणावर वाहतूक पोलीस आपले काम पार पडतातच. त्यातच सध्या अपराधाचे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे दररोज मारामाऱ्या करणे आणि समाज विघातक कामे करणे हाच काय तो गुंडांचा धंदा झालेला आहे. क्राइम ब्रांच हा पोलीस विभागाचा महत्त्वाचा भाग नेहमीच राहिलेला आहे पण सध्या पोलीस इतके कमी आहेत की त्यांनी अपराध्यांच्या शोधापेक्षा घरी राहणेच पसंत केलेले दिसते. सरकारने पंधरा हजार पोलिसांची भरती करणे म्हणजे उंटाच्या तोंडात दहा ते पाच ग्रॅम अन्न टाकण्यासारखे आहे आणि आता तर सायबर गुन्ह्यांचे प्रमाण इतके वाढलेले आहे. या विभागातही फसवणुकीचे प्रचंड मोठ्या प्रमाणात प्रकार घडत आहेत, त्याबद्दल बोलता येण्याची सोय नाही. ते काहीही असले तरी १५००० पोलिसांची भरती केल्यावर ही समस्या सुटेल असे वाटत नाही. सरकारने किमान एक लाख पोलिसांना पोलीस दलात भरती केल्याशिवाय पर्याय किंवा गुन्हे कमी करण्यासाठी तरणोपाय दिसत नाही.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

पोलीस भरती, रेशन दुकानदारांच्या मार्जिनमध्ये वाढ, जामीनदाराची अट शिथील

# शासनाचे धडाकेबाज निर्णय

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यात तब्बल १५ हजार पोलिसांची भरती करण्याच्या महत्त्वकांक्षी प्रस्तावाला मंजुरी दिली.



राज्यातील हजारो तरुण गत अनेक वर्षांपासून या पोलिस भरतीची प्रतिक्षा करत होते. अखेर सरकारने हा निर्णय हातावेगळा करून त्यांची मागणी पूर्ण केली आहे. प्रस्तुत निर्णयामुळे राज्यातील हजारो तरुणांचे पोलिस बनण्याचे स्वप्न साकार होणार आहे.

सरकारच्या निर्णयानुसार, कोणत्या जिल्ह्यात किती भरती होणार हे अजून स्पष्ट झाले नाही. पण त्याची एक जाहिरात निघेल. त्यानंतर लवकरच पुढील प्रक्रिया सुरू होईल. राज्यातील हजारो तरुण या पोलिस भरतीची प्रतिक्षा करत होते. या निर्णयाद्वारे मोठी मागणी पूर्ण झाली आहे.

राज्य मंत्रिमंडळाने अन्न व नागरी पुरवठा विभाग, विमानचालन विभाग व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्याही प्रत्येकी एका निर्णयाला मंजुरी दिली आहे.

राज्यातील रास्त भाव दुकानदारांच्या मार्जिनमध्ये वाढ करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना अन्न, धान्याचे वितरण करणाऱ्या रास्त भाव दुकानदारांच्या मार्जिनच्या रकमेत वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. रास्त भाव दुकानदारांना सध्या १५० रुपये प्रति क्विंटल या दराने कमिशन दिले जाते. त्यात २० रूपये प्रति क्विंटल वाढ करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अखत्यारीत महामंडळांमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कर्ज योजनेतील जामीनदाराच्या अटी शिथिल करण्यात आल्या आहेत. जे लोक प्रामुख्याने १ किंवा २ लाख रुपयांचे कर्ज घेतात, त्यांना शासकीय कर्मचाऱ्यांची हमी लागत होती. पण यापुढे ही हमी लागणार नाही. एनएसएफडीसी किंवा महामंडळांकडून पुरवल्या जाणाऱ्या शासनहमीला ५ वर्षांची मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे एनएफडीसीच्या प्रलंबित ११२९४ कर्जदारांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# पिक्चर अभी बाकी है!

## राहुल गांधींचा इशारा

### मतदार यादीत राष्ट्रीय स्तरावर तफावत

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १२ :** काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी मंगळवारी सांगितले की, फक्त एक जागा नाही तर अनेक जागा आहेत जिथे मतदार याद्यांमध्ये छेडछाड केली जात आहे. हे राष्ट्रीय पातळीवर पद्धतशीरपणे केले जात आहे.



राहुल गांधी पुढे म्हणाले, निवडणूक आयोगाला हे माहिती आहे आणि आम्हालाही. पूर्वी कोणताही पुरावा नव्हता, पण आता आमच्याकडे पुरावे आहेत. आम्ही संविधानाचे रक्षण करत आहोत. एक व्यक्ती एक मत हा संविधानाचा पाया आहे. 'एक व्यक्ती एक मत' लागू करणे हे निवडणूक आयोगाचे कर्तव्य आहे, परंतु त्यांनी तसे केले नाही.

**बिहारमध्ये राहुल गांधींची यात्रा**

राहुल गांधी यांची बिहारमधील आतापर्यंतची सर्वात मोठी यात्रा १७ ऑगस्ट पासून सुरू होणार आहे. मतदार पडताळणी आणि निवडणुकीत मत चोरीच्या आरोपांवर आधारित काँग्रेस नेत्याची मतदान अधिकार यात्रा २३ जिल्ह्यांमधून जाईल, ज्यामध्ये ५० विधानसभा जागा समाविष्ट असतील. २०२० च्या विधानसभा निवडणुकीत जिंकलेल्या जागांवर त्यांचा फोकस असेल.

## मतदार पडताळणी पुन्हा गोंधळ

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १२ :** बिहार एसआयआरवर चर्चा व्हावी या मागणीसाठी विरोधकांनी मंगळवारीही संसदेच्या दोन्ही सभागृहात गोंधळ घातला. त्यामुळे लोकसभा आणि राज्यसभा तहकूब करण्यात आली. लोकसभेचे कामकाज दुपारी ४:३० वाजता सुरू होताच गोंधळ झाला.

विरोधी पक्षाच्या खासदारांनी कागदपत्रे फाडून सभापतींच्या खुर्चीकडे फेकली. भाजप खासदार जगदंबिका पाल सभागृहाचे कामकाज चालवत होते. ते म्हणाले, विरोधी पक्ष उपनेत्याकडून संकेत मिळाला. त्यानंतर कागदपत्रे फाडून खुर्चीकडे फेकण्यात आली. यावर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले, तुम्ही सभागृहाची प्रतिष्ठा कमी केली आहे. देश तुम्हाला माफ करणार नाही. तुमच्या भागातील लोक तुमच्यावर नाराज असतील. यानंतर, सोमवार, १८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत लोकसभा तहकूब करण्यात आली.

संसदेचे कामकाज सुरू होण्यापूर्वी, प्रियंका गांधींसह इंडिया ब्लॉकचे खासदार मिंता देवी यांचे नाव आणि चित्र असलेले टी-शर्ट घालून मकर द्वार येथे पोहोचले. बिहार निवडणूक आयोगाच्या मतदार यादीत मिंता देवी ही १२४ वर्षांची असून पहिल्यांदाच मतदार झाली आहे, असा विरोधकांचा दावा आहे.

## जस्टिस वर्माविरुद्ध महाभियोग प्रस्ताव मंजूर

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १२ :** लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी मंगळवारी न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याविरुद्ध महाभियोग प्रस्ताव मंजूर केला.

अध्यक्षांनी चौकशीसाठी ३ सदस्यीय समितीची घोषणा केली. त्यात सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयातील प्रत्येकी एक न्यायाधीश आणि एक कायदेतज्ज्ञ यांचा समावेश आहे.


















# पावसाळ्यातील बेडकांप्रमाणे निवडणूक आली की जरांगे बाहेर निघतात

## परिणय फुकेंची टीका



**मुंबई :** पावसाळा आला की जशी बेडकं बाहेर निघतात तशी निवडणूक आली की जरांगे बाहेर निघतात अशी टीका भाजप आमदार परिणय फुके यांनी केली आहे. तसेच गोवा ओबीसी अधिवेशावरून मनोज जरांगे यांनी केलेल्या आरोपामध्ये तथ्य नाही असेही त्यांनी यावेळी म्हटले आहे. आमदार परिणय फुके म्हणाले की, मनोज जरांगे हे बेताल वक्तव्य करत स्वतःला चर्चेत ठेवण्यासाठी प्रयत्न करत असतात. जरांगे पाटील यांना मराठा समाजाला आरक्षण आणि न्याय मिळवून द्यायचा आहे की नाही? हा सर्वात पहिला प्रश्न आहे. परिणय फुके म्हणाले की, मनोज जरांगे यांच्या मनात फक्त मराठा आणि ओबीसी आणि इतर सगळ्या समाजात भांडण लावण्याचे काम जरांगे पाटील करत आहेत. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी गोव्यातील राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या अधिवेशनात मराठा आंदोलनात दंगल घडवण्याचा कट रचल्याचा गंभीर आरोप केला आहे.

# आमदारांना 10 महिन्यांपासून निधी नाही

## लोकप्रिय योजनांचा फटका : संजय गायकवाड



**मुंबई :** महायुती सरकारच्या काही लोकप्रिय योजनांमुळे आमदारांना मागील 10 महिन्यांपासून कोणताही निधी मिळाला नसल्याचा दावा सत्ताधारी शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी केला आहे. त्यांच्या या दाव्यामुळे सत्ताधारी महायुतीच्या गोटात एकच खळबळ माजली आहे. महाराष्ट्र सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे राज्य सरकारच्या तिजोरीत खडखडाट निर्माण झाल्याची चर्चा आहे. या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांना दरमहा 1500 रुपयांचे अर्थसहाय्य केले जाते. महायुती सरकारची ही योजना अत्यंत महत्त्वकांक्षी असली तरी ती चालवण्यासाठी सरकारला मोठी कसरत करावी लागत आहे. त्यामुळे सरकार कोणत्या ना कोणत्या विभागाचे पैसे वळवून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न करत आहे.

# किरीट सोमय्यांनी ईव्हीएम हॅक केले

## संजय राऊत यांचा गौप्यस्फोट



**मुंबई :** उद्धव ठाकरे यांनी काल सांगितले की भाजपचा एक नेता EVM हॅक कशी होते. तेव्हा त्यांनी दाखवले की कमळाला दिलेले मतदान कसे हाताला जात आहे. याचे प्रात्यक्षिक त्यांनी शिवसेना भवनामध्ये आम्हाला करुण दाखवले. उद्धव ठाकरे यांच्यासोबत मी तिथे हजर होतो. तेव्हा शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे तिथे उपस्थित होते, असे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. खासदार संजय राऊत म्हणाले की, EVM हॅक करणाऱ्या हॅकरला जे भाजप नेते सोबत घेऊन आले होते त्यांचे नाव किरीट सोमय्या आहे. मशीन हॅक करत आपण जिंकू शकतो असा त्यांनी म्हणताच उद्धव ठाकरेंनी त्यांनी आपल्याला असे काही करण्याची गरज नाही, लोकं आपल्यासोबत असल्याचे सांगितले.

दिल्लीच्या रस्त्यावर काल संसदेच्या 300 पेक्षा जास्त खासदारांनी जे आंदोलन आणि संघर्ष केला तो लोकशाहीच्या रक्षणासाठी होता. संसदेला लोकशाहीचे सर्वोच्च मंदिर मानतात. पण त्या मंदिरात चोऱ्या-माऱ्या करत सत्तेवर आलेले लोकं आमच्या आजू-बाजूला आहेत. त्या चोरांचे हस्तक म्हणून निवडणूक आयोग काम करत आहे.

# राज्यातील रास्त भाव दुकानदारांच्या मार्जिनमध्ये वाढ

**मुंबई :** राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकारकांना अन्नधान्य व साखरेचे वाटप करणाऱ्या रास्त भाव दुकानदारांच्या मार्जिनमध्ये क्विंटल मागे २० रुपयांची वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. त्यामुळे आता दुकानदारांना क्विंटलमागे वीस रुपयांची वाढ मिळाल्याने यापूर्वीच्या १५० रुपयाऐवजी १७० रुपये मार्जिन मिळणार आहे. अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजना शिधापत्रिकाधारकांना ५३ हजार ९१० रास्तभाव दुकानदारांमार्फत ई-पॉस मशिनद्वारे बायोमेट्रीक पडताळणी करून अन्नधान्य, साखर व इतर वस्तुंचे वितरण करण्यात येते. या दुकानदारांना केंद्र शासनाकडून ४५ रुपये आणि राज्य शासनाकडून १०५ रुपये असे एकूण क्विंटलमागे १५० रुपये मार्जिन म्हणून दिले जात होते. या मार्जिन रकमेत वाढ कण्याची विनंती या दुकानदारांच्या संघटनांकडून करण्यात येत होती. त्यानुसार या मार्जिनमध्ये क्विंटलमागे २० रुपयांची वाढ करण्यास मंजुरी देण्यात आली. त्यानुसार क्विंटलमागे रास्त भाव दुकानदारांना १७० रुपये (१७०० रुपये प्रति मेट्रीक टन) असे मार्जिन देण्यात येणार आहे.

# भाजपची सत्ता जाण्याच्या मार्गावर

## उद्धव ठाकरे यांचा दावा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पक्ष सोडून जाणाऱ्या नेत्यांवर कपाळाला हात लावून बसण्याची वेळ आल्याचा दावा केला आहे. सत्तेच्या नादी लागून अनेकजण सत्ताधारी महायुतीत गेले. पण आत्ता भाजपची सत्ता जाण्याच्या मार्गावर असल्यामुळे ते तिकडे आपल्या कपाळाला हात लावून बसलेत, असे ते म्हणालेत. त्यांच्या या विधानामुळे देशात व राज्यात मोठे उलटफेर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत आज मातोश्री येथे विदर्भ व मुंबईतील भाजप व राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी ठाकरे गटात प्रवेश केला. यावेळी त्यांना मार्गदर्शन करताना उद्धव ठाकरे यांनी कथित मतचोरीच्या मुद्यावरून भाजपवर निशाणा साधला. ते म्हणाले, कालचा दिवस देशाच्या व महाराष्ट्राच्य दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा होता. आपण सर्वजण देशात जे काही सुरू आहे ते पाहत आहोत.

महाराष्ट्रात बेबंदशाही असल्यासारखा भ्रष्टाचार बोकाळला आहे. हे मी काल म्हणालो, आजही म्हणत आहे व उद्याही म्हणेल. राज्यात भ्रष्टाचार करणाऱ्यांवर कोणतीही कारवाई होत नाही. कारण, भ्रष्टाचार केल्याने कुणाला काहीच फरक पडत नाही.



काल दिल्लीत विरोधी पक्षांच्या 300 खासदारांना अटक करण्यात आली. हे लोक मतांची चोरी करून सत्तेत बसलेत. ती चोरी आता पकडली गेली आहे. याविषयी हे खासदार निवडणूक आयोगाच्या कार्यालयात जाऊन जाब विचारणार होते. पण त्यांना जाऊ देण्यात आले नाही. पण आता एकेक करून आपल्या डोळ्यांवरच्या पट्ट्या निघत आहेत. आता यांची सत्ता जाण्याची वेळ आली आहे. यांची नाटकं लोकांनी ओळखली आहेत, असे ठाकरे म्हणाले. उद्धव ठाकरे यांनी यावेळी पक्षांतर केलेल्या नेत्यांवर कपाळाला हात लावून बसण्याची वेळ आल्याचाही दावा केला. ते म्हणाले, दोन-तीन वर्षांपूर्वी शेतकरी आपल्या न्याय हक्कासाठी दिल्लीला जात होते. पण केंद्र सरकारने त्यांच्या मार्गात खिळे रोवले. मोठे बॅरिकेड्स लावले. आता जनतेने निवडून दिलेल्या खासदारांनाही प्रश्न विचारता येत नाहीत. मंत्र्यांचे भ्रष्टाचार पुराव्यानिशी बाहेर काढले तरी त्यांच्यावर कोणती कारवाई होत नाही. हे किती दिवस सहन करायचे? एकूणच हे थापा मारून आलेले सरकार आहे.

राज्यातही तसेच सरकार आहे. शिवसेनेत आलेल्या सर्वांचे स्वागत. आपण जनतेच्या हितासाठी काम करू. सत्तेच्या नादी लागून तिकडे अनेकजण गेलेत. पण आज ते कपाळाला हात लावून बसलेत. कारण, आता भाजपची सत्ता जाण्याच्या मार्गावर आहे, असेही उद्धव ठाकरे यावेळी बोलताना म्हणाले.

# विद्यार्थी संघटनांच्या आंदोलनापुढे पुणे विद्यापीठाची माघार

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. १२ :

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आयोजित केल्या जाणाऱ्या 'व्हॉइस ऑफ देवेंद्र' या वक्तृत्व स्पर्धेवरून मोठा वाद निर्माण झाला होता. या स्पर्धेच्या विरोधात एनएसयूआय आणि समविचारी विद्यार्थी संघटनांनी आज विद्यापीठ परिसरात आंदोलन केले. स्पर्धेच्या नावाला होणारा वाढता विरोध पाहता, आता हे परिपत्रक मागे घेण्यात आले असल्याचे विद्यापीठाकडून जाहीर करण्यात आले आहे. मात्र, याबाबत लेखी उत्तर द्या या मागणीवर आंदोलक ठाम आहेत.

सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ५ ऑगस्ट रोजी एका वक्तृत्व स्पधेर्बाबत परिपत्रक काढले होते. विभागाच्या वतीने आयोजित या स्पधेर्ला 'व्हॉइस ऑफ देवेंद्र' असे नाव देण्यात आले होते. ही स्पर्धा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रेरणेतून आयोजित केली जात असल्याचेही परिपत्रकात म्हटले होते. मात्र, या स्पर्धेच्या नावाला विरोधकांनी जोरदार विरोध दर्शवला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात 'व्हॉईस ऑफ देवेंद्र' वक्तृत्व स्पर्धेवरून एनएसयूआय आणि समविचारी विद्यार्थी आज आंदोलन सुरू केले. ही स्पर्धा राजकीय व्यक्तिपूजेचा प्रकार असल्याचा विद्यार्थ्यांनी आरोप केला आहे. वाढता विरोध पाहता अखेर हे परिपत्रक मागे घेण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला. मात्र, विद्यार्थ्यांना अधिकृत लेखी सुधारित परिपत्रक हवे आहे. जोपर्यंत लेखी सुधारित परिपत्रक हातात मिळत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही, अशी भूमिका विद्यार्थ्यांनी घेतली आहे.

विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेचे सदानंद भोसले यांनी हे परिपत्रक मागे घेतल्याची माहिती दिली. या स्पधेर्चे आयोजन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आणि संबंधित विभागाने केलेले नसून, स्वारंभ फाऊंडेशन, नाशिक प्रतिष्ठान आणि आय एफ ई डबल एल ओ डब्ल्यु फाऊंडेशन या फाऊंडेशनने केले असल्याचे स्पष्टीकरण एनएसएस विभागाच्या प्रमुखांनी दिले. विद्यापीठाने परिपत्रक मागे घेतले.

# आरोग्य स्वयंसेविकांचा एल्गार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

एकीकडे मुंबई हिवताप आणि डेंग्युच्या साथीचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव झालेला असताना सार्वजनिक आरोग्य सेवेचा कणा बनलेल्या आरोग्य स्वयंसेविकांवर मुंबई महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या कामाची जबाबदारी सोपविण्याचा घाट घालण्यात आला आहे. दुसरीकडे उच्च न्यायालयाने आरोग्य स्वयंसेविकांच्या बाजून दिलेल्या निर्णयानुसार त्यांना महापालिकेच्या सेवेत कायम करण्याऐवजी प्रशासनाने याप्रकरणी सर्वेच्च न्यायालयात धाव घेतली आहे. यामुळे संतप्त झालेल्या तब्बत तीन हजारांहून अधिक आरोग्य स्वयंसेविकांनी मुंबई महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीचे काम करण्यास नकार दिला आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य सेवेचा प्रचार आणि प्रसार करण्याची जबाबदारी आरोग्य स्वयंसेविकांवर आहे. साथीच्या आजारांचा प्रदुर्भाव वाढू नये यासाठी वस्त्यांमधील घरोघरी जाऊन जनजागृती करणे, गरोदर माता, ० ते पाच वर्षांच्या बालकांनी इंजेक्शन घेतली की नाही याची चौकशी करणे, त्यांच्यासाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करणे, क्षय रुग्णांचा शोध घेऊन ते औषधोपचार घेतात की नाही यावर लक्ष ठेवणे, कुटुंब नियोजनासाठी प्रचार-प्रसार करणे, त्याबाबतच्या साहित्याचा वापर करणे, ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना पंतप्रधान आयुष्यमान कार्ड काढून देणे आदी विविध कामांची जबाबदारी आरोग्य स्वयंसेविकांवर सोपविण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून मुंबई मोठ्या प्रमाणात हिवताप आणि डेंग्युच्या साथीचा प्रादुर्भाव होत असून रुग्ण संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे साथीच्या आजारांविषयी जनजागृती करणे, कोणती काळजी घ्यावी याची माहिती देणे, डासांचा प्रादुर्भाव होत असलेल्या, तसेच डासांची उत्पत्ती स्थाने शोधणे आदी काम करण्यात आरोग्य स्वयंसेविका व्यग्र आहेत. एकुणच आरोग्य स्वयंसेविका मुंबई महापालिकेच्या आरोग्य सेवेचा कणा बनल्या आहेत. घरोघरी जाऊन आरोग्य सेवेचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या आरोग्य सेविकांवर मुंबई महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीचे काम सोपविण्याचा घाट घालण्यात आला आहे.

# तरुणाचा बेदम मारहाणीत मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

तालुक्यातील बेटावद खुर्द येथील तरुण जामनेर शहरातील एका कॅफेत अल्पवयीन मुलीसोबत गेला होता, अशी माहिती मिळाल्यानंतर गावातील काही तरुणांनी त्याला कॅफेतून बाहेर काढून बेदम मारहाण केली. घरी जाऊन त्याचा मृत्यू झाला, अशी माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक महेश्वर रेड्डी यांनी पत्रकारांना दिली. दरम्यान, सुलेमान याच्या मृत्युप्रकरणी वडील रहीम खान पठाण यांनी जामनेर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले. सुलेमान रहीम खान पठाण (वय २१ रा. बेटावद खुर्द ता. जामनेर) असे या मृत तरुणाचे नाव आहे.

# पोलीस भरतीत महाभरतीचा बिगुल

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

महाराष्ट्र पोलीस दलातील शिपायांची सुमारे १५ हजार पदे भरण्यात येणार आहेत. त्याकरिता सन २०२४-२५ च्या पोलीस शिपाई भरती प्रक्रियेस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या भरतीमध्ये सन २०२२ व सन २०२३ मध्ये संबंधित पदाची विहित वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांनाही एक वेळची विशेष बाब म्हणून अर्ज करता येणार आहे व भरती प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे.

राज्याच्या पोलीस दलात सन २०२४ दरम्यान रिक्त असलेली व २०२५ मध्ये रिक्त होणाऱ्या पदांचा आढावा घेऊन, ही भरती करण्यात येणार आहे. भरण्यात येणारी पदांची संख्या अशी, पोलीस शिपाई - १० हजार ९०८, पोलीस शिपाई चालक - २३४, बॅण्डस मॅन - २५, सशस्त्री पोलीस शिपाई - २ हजार ३९३, कारागृह शिपाई - ५५४. पोलीस शिपाई व कारागृह शिपाई ही पदे गट - क संवर्गातील आहेत. पोलीस शिपाई भरती प्रक्रिया त्या-त्या जिल्हास्तरावरून राबविण्यात येते. त्यासाठी ओएमआर आधारित लेखी परीक्षा घेण्यात येईल.

भरतीसाठी अर्ज मागवणे, अर्जाची छाननी, त्यावर प्रक्रिया तसेच उमेदवारांची शारिरीक परीक्षा, त्यातून पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा यासाठी अनुषांगिक प्रक्रिया राबविण्याचे अधिकार प्रशिक्षण व खास पथके विभागाचे अतिरिक्त पोलीस महासंचालकांना देण्यासही बैठकीत मान्यता देण्यात आली.

# दहीहंडी सरावादरम्यान बालकाचा मृत्यू

## मंडळाच्या अध्यक्षाविरोधात गुन्हा दाखल

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

दहीहंडीचा सराव सुरू असताना सहाव्या थरावरून कोसळून ११ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला. या दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या मुलाचे नाव महेश जाधव असून दहिसरच्या केतकीपाडा येथे रविवारी रात्री ही दुर्घटना घडली. हा मुलगा नवतरुण मित्र मंडळ पथकातील सदस्य होता. याप्रकरणी सोमवारी दहिसर पोलीस ठाण्यात मंडळाच्या अध्यक्षाविरोधात निष्काळजीपणे कृती करून मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दहिसरच्या केतकीपाडा येथील हनुमान नगरमध्ये नवतरूण मित्रमंडळ आहे. या मंडळाचे दहीहंडी पथक असून ते विविध ठिकाणीदहीहंडी उत्सवात भाग घेत असते. यंदा मंडळाचे पथक दहीहंडी उत्सावाची तयारी करीत होते. त्यासाठी गेल्या काही दिवसांपासून सराव सुरू होता. या पथकात महेश रमेश जाधव (११) या बालगोविंदाचा समावेश होता. रविवारी रात्री पथकाने सराव करताना एकूण सहा थर रचले होते. महेश सर्वात लहान असल्याने सहाव्या थरावर चढला होता. रात्री ९.४५ च्या सुमारास तो सहाव्या थरावरून खाली कोसळला. त्याला झेलण्यासाठी कुणी नसल्याने तो जमिनीवर पडला. त्याला दहिसरच्या खासगी रुग्णालयात नेण्यात आले. तेथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

या प्रकरणात सुरवातीला दहिसर पोलिसांनी अपमृत्यूचा गुन्हा दाखल केला होता. नंतर महेशची आई संगिता जाधव (३०) यांनी याबाबत मंडळाने सु?क्षेची कुठलीही साधने पुरवली नसल्याची तक्रार दिली. त्या तक्रारीवरून दहिसर पोलिसांनी नवतरूण मित्रमंडळाचा अध्यक्ष बाबू सुरनार याच्याविरोधात निष्काळजीपणे मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम १०६, तसेच सरकारी सेवकाच्या मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी कलम २२३ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. नेमका महेश कसा खाली पडला त्याचा पोलीस तपास करीत आहेत.

नियमानुसार दहीहंडी पथकातील गोविंदांना हेल्मेट, पट्टा आदी सुरक्षेची साधने पुरविणे आवश्यक आहे. पडलेल्या गोविंदाना दुखापत होऊ नये यासाठी जमिनीवर जाड गादी अंथरणे आवश्यक आहे. मात्र या मंडळाने अशा प्रकारच्या कुठल्याही सुरक्षेच्या उपाययोजना केल्या नव्हत्या.

# सायबर मदत क्रमांकावर दररोज दोन हजार तक्रारी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती यांनी सोमवारी शहरातील कायदा व सुव्यवस्था, गुन्हेगारी, वाहतूक समस्या आणि पोलीस दलातील तांत्रिक बदलांबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली. आजही मुंबईला असलेला दहशतवादी हल्ल्याचा धोका लक्षात घेऊन त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यास प्राथमिकता असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच सायबर गुन्हेगारी व अमली पदार्थांचे आव्हान कायम असल्याचे सांगत आहे. गेल्या दोन वर्षांत मुंबई सायबर विभागाने नागरिकांचे ३०० कोटी वाचवले आणि अनेक आरोपींना अटक केली. मुंबईमध्ये सायबर फसवणुकीबाबत नागरिकांकडून दररोज दोन हजारांहून अधिक दूरध्वनी येतात. यात प्रतिदिन सुमारे ६० लाख रुपये गोठवले जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

मुंबईसारख्या देशाच्या आर्थिक राजधानीला आजही दहशतवादी हल्ल्याचा धोका कायम आहे. सुरक्षा हे आमचे सर्वोच्च प्राधान्य असून, प्रतिबंधात्मक उपाययोजना सतत सुरू आहेत.मुंबईत शहरी नक्षलवाद्यांचे अस्तित्व नाकारता येत नाही. विशेष पथक दररोज यावर लक्ष ठेऊन आहे. तसेच, बेकायदेशीरपणे वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांवर कारवाई करण्यात येत असून गेल्या काही महिन्यांमध्ये एक हजारांहून अधिक बांगलादेशी नागरिकांना हद्दपार करण्यात आल्याची माहिती देवेन भारती यांनी यावेळी दिली.




मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती यांची माहिती

गेल्या अनेक दशकांपासून मुंबईत सुरू असलेली अमली पदार्थांची तस्करी, सध्या वाढत असलेले सायबर गुन्ह्यांचे प्रमाण पोलीस दलासाठी एक आव्हान आहे. अमली पदार्थांची तस्करी, खरेदी - विक्री रोखणे आणि सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. महिला सुरक्षेकडे अधिक भर देणार येत असल्याचेही भारती यांनी सांगितले.

मुंबईतील वाढत्या वाहतूक समस्येवर तोडगा काढण्याचे उपाय करण्यात येत आहेत. त्यासाठी वाहतूक पोलिसांना बदलीमध्ये सर्वाधिक संख्याबळ देण्यात आले. मुंबईतील वाहतुकीची परिस्थिती, भौगोलिक स्थिती आणि सुरू असलेली कामे इत्यादींमुळे वाहतुकीची समस्या निर्माण झाली आहे.

# रक्षाबंधननिमित्त एसटीला १३७ कोटी रुपयांचे उत्पन्न

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

यंदा रक्षाबंधन आणि त्याला जोडून आलेल्या सुट्टयांमुळे ८ ते ११ ऑगस्ट २०२५ या चार दिवसांमध्ये प्रवाशी वाहतुकीतून एसटीला १३७.३७ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. विशेष म्हणजे ११ ऑगस्टला एका दिवशी तब्बल ३९ कोटी रुपयांचे उत्पन्न महामंडळाला प्रवासी वाहतुकीतून मिळाले आहे. यंदाच्या आर्थिक वर्षातील हे विक्रमी उत्पन्न आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

सरनाईक म्हणाले, दरवर्षी एसटीला रक्षाबंधन आणि भाऊबीज (दिवाळी) या दोन दिवसात विक्रमी उत्पन्न मिळत असते. कारण, या दिवशी भाऊ बहिणीकडे किंवा बहिण भावाकडे असे प्रवासी



परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

दळणवळण मोठ्या प्रमाणामध्ये होते. परिणामी, गेली कित्येक वर्ष रक्षाबंधन सणाच्या कालावधी एसटीला त्या वषार्तील विक्रमी उत्पन्न मिळत आले आहे. यंदा रक्षाबंधन आणि त्याच्या दुसऱ्या दिवशी एसटीला प्रवाशांची प्रचंड गर्दी झाली होती. रक्षाबंधनच्या आदल्या दिवशी म्हणजे शुक्रवारी ३०.०६ कोटी रुपये, रक्षाबंधन दिवशी म्हणजे शनिवारी ३४.८६ कोटी व दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी ३३.३६ कोटी रुपये तर सोमवारी तब्बल ३९.९ कोटी इतके विक्रमी उत्पन्न एसटीला मिळाले आहे. रक्षाबंधन सणाच्या निमित्ताने ८ ते ११ ऑगस्ट या ४ दिवसात १ कोटी ९३ लाख प्रवाशांनी एसटीमधून सुरक्षित प्रवास केला आहे. त्यामध्ये महिला प्रवाशांची संख्या तब्बल ८८ लाख आहे.

रक्षाबंधन सणानिमित्त एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रवाशांनी दिलेल्या प्रतिसादाबद्दल एसटी महामंडळाचे अध्यक्ष व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आभार मानले आहेत. तसेच आपल्या घरी सण असून देखील कर्तव्याला प्राधान्य देत अत्यंत मेहनतीने काम करुन विक्रमी उत्पन्न आणणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांचे मंत्री सरनाईक यांनी अभिनंदन केले आहे.

# ग्रंथालयीन सेवासुविधांच्या उन्नतीसाठी.....

कालच्या अंकावरुन पुढे

एआय खादे नवीन पुस्तक, जर्नल किंवा इतर साहित्य प्रकाशित झाल्यावर एआय टूल्स वाचकांना सतर्क करू शकतात, तसेच विशिष्ट ग्रंथालय संसाधनांकडे निर्देशित करू शकतात. पुनरावृत्ती होणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा त्रास संपेल, कारण पुनरावृत्ती थांबेल आणि वेळ वाचेल.

ग्रंथालयाच्या कामाची गुणवत्ता वाढेल. संशोधनाचे प्रमाणीकरण किंवा पुनर्वापरक्षमता त्याच्या वाचकांच्या संख्येपेक्षा जास्त महत्त्वाचे आहे, कारण केवळ ठोस आणि वैध संशोधनच विस्तृत वाचकवर्गाला पात्र आहे. ग्रंथालय प्रक्रिया आणि डिजिटल संसाधनांमध्ये मशीन लर्निंग लागू केल्याने संग्रह विश्लेषण, व्हिज्युअलायझेशन आणि जतन ऑप्टिमाइझ करता येते आणि सेवांच्या तरतुदीशी संबंधित खर्च कमी करता येतो.

कृत्रिम बुद्धिमत्ता साधने प्रगत शोध क्षमता प्रदान करून, संबंधित संसाधनांची शिफारस करून आणि डेटा विश्लेषणात मदत करून विद्यार्थ्यांना आणि संशोधकांना मदत करतात. ग्रंथालयांमध्ये व्हर्च्युअल असिस्टंट आणि चॅटबॉट्सचा वापर खूप सामान्य झाला आहे, वारंवार विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देऊन मार्गदर्शन होते, यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांचे काम सोपे झाले.

एआय ग्रंथालय सेवा वाढवू शकते आणि दक्षता सुधारू शकते, परंतु ते अल्गोरिदमिक पूर्वाग्रह, डेटा सुरक्षा, कॉपीराइट संबंधी काळजी आणि मानवी संपर्काचे संभाव्य विस्थापन याबद्दल देखील चिंता निर्माण करते. एआयकडून कोणीही तथ्ये मिळवू शकते, परंतु त्या तथ्यांचा अर्थ काय आहे, ते कसे जोडतात आणि ते विश्वसनीय आहेत की नाही हे समजून घेणे, यावेळी मानवी कौशल्ये अमूल्य ठरतात. एआय-चालित ऑटोमेशन ग्रंथालय कर्मचारी आणि वाचकांमधील मानवी संपर्क कमी करू शकते, ज्यामुळे ग्रंथालये वापरत असलेल्या वैयक्तिकृत समर्थन आणि मार्गदर्शनावर परिणाम होऊ शकतो. एआयचा वापर चुकीची माहिती निर्माण करण्यासाठी आणि खोटेपणा पसरवण्यासाठी देखील केल्या जाण्याची शक्यता आहे, ज्यामुळे माहितीचा विश्वासार्ह स्त्रोत म्हणून ग्रंथालयाची भूमिका आव्हानात्मक ठरते. जगात मोबाईल आणि संगणक क्रांती मानवांच्या विकासासाठी झाली, परंतु या तंत्रज्ञानाचे तोटे देखील दिसून येतात. आज, सायबर गुन्हे, सोशल मीडिया व्यसन, ऑनलाइन बनावट ओळख, पैसे लावून ऑनलाइन गेम, फसवेगिरी, अस्वस्थ प्रक्षोभक जाहिराती, ई-कचरा, रेडिएशनमुळे दरवर्षी अब्जावधी डॉलर्सचे नुकसान होते, जीवाचे आणि मालमत्तेचे, मौल्यवान आरोग्याचे आणि पर्यावरणाचे प्रचंड नुकसान होते. त्याचप्रमाणे, भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे होणारा गैरवापर किंवा संकटे नाकारता येत नाहीत.

इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या माहितीमधून एआय फिल्टर करते आणि गरजेनुसार माहिती सादर करते. ग्रंथालयांनी सर्व वाचकांसाठी एआय-संचालित सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला पाहिजे, ग्रंथालयांनी ग्रंथालयाच्या मूल्यांनुसार उपाय विकसित आणि अंमलात आणण्यासाठी ग्रंथपाल, तंत्रज्ञ आणि इतर भागधारकांमध्ये सहकार्याला प्रोत्साहन दिले पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्ता स्वीकारताना, ग्रंथालयांनी त्यांच्या सेवांचा मानवी पैलू राखण्याचा आणि वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जरी एआय ग्रंथालयांना अनेक फायदे देत असले तरी, ते सुरक्षित आहे याची खात्री करण्यासाठी संभाव्य धोके आणि आव्हाने हाताळणे महत्वाचे आहे. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचा मानवी विकासावर खूप जलद गतीने परिणाम होईल असे गृहीत धरून आपण त्याचा सुज्ञपणे वापर करू. ग्रंथालयाला प्रगत बनवण्यात एआयचे योगदान अमूल्य ठरू शकते, आपल्याला फक्त त्याच्या वापरात कुशल, सावध आणि जागरूक राहण्याची आवश्यकता आहे.

आपण विषयाशी संदर्भानुसार संबंधित हजारो कागदपत्रांच्या सामग्रीची तुलना करू शकतो. एआय जगभरात इंटरनेट वर उपलब्ध असलेल्या साहित्यातून विषयानुसार कागदपत्रे शोधते, त्यांचा अभ्यास करते आणि वाचकांना जलद डेटा प्रदान करते. संशोधन पत्रांच्या वास्तविक मजकुरावर आधारित एआय अल्गोरिदम वास्तविक संशोधनाच्या चांगल्या मॅपिंग सिस्टम तयार करतील, जे संशोधकांसाठी उपयुक्त ठरतील. एआयच्या मदतीने कोणत्याही पुस्तकाचा किंवा लेखाचा सारांश देणे ही एक अतिशय सोपी प्रक्रिया आहे, हे मोठमोठा डेटा देखील लहान परिच्छेदांमध्ये उपलब्ध करून देते.

डॉ. प्रीतम भी. गेडाम
०८२३७४ १७०४१

उत्तरार्ध

गडचिरोली
# महासागर जिल्हा विशेष
बुधवार, दि. १३ ऑगस्ट २०२५


## तुमनूर येथे प्रा. आ. केंद्र नवीन इमारतीचे भूमिपूजन

**सिरोंचाः** तालुक्यातील ग्रामपंचायत तुमनूर येथे आरोग्य उपकेंद्र नवीन इमारतीचे बांधकाम करण्याकरिता जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग सिरोंचा अंतर्गत मंजूर झाली असून, सदर इमारतीबांधकामाचे भूमिपूजन आमदार डॉ.धर्मरावबाबा आत्राम यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी तूमनूर ग्रामपंचायत सरपंच पदमा राजन्ना सिडाम, उपसरपंच बबीता किरण वेमुला, सिरोंचा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी एस. एन. कस्तुरे, ग्रामपंचायत सदस्य सडवली दुर्गम, ब्रम्हय्या दबगटला, किरण वेमुला आपदा मित्र मास्टर ट्रेनर तथा सामाजिक कार्यकर्ता, राष्ट्रवादी कॉंग्रेस तालुकाध्यक्ष मधुकर कोल्लूरी, नगरसेवक सतिश राचर्लावार, नगरसेवक जगदीश रालबंडीवार, कार्यकारी अध्यक्ष मदनया मादेशी, शहर अध्यक्ष रवि सुलतान, पत्रकार तथा सोशल मीडिया प्रमुख नागभूषणम चकिनारपुवार, सामाजिक कार्यकर्ता ओमप्रकाश ताटीकोंडावार, रामकिष्टू रामया निलम जिल्हा उपाध्यक्ष, वेंकटस्वामी वेमुला, वेंकटेश दुर्गम, रमेश पोट्टाला, राजू ताटी, नागेश गुरुसिंग, वेंकटस्वामी गोरा आदी उपस्थित होते.

# खनिज प्रभावित क्षेत्रासाठी जिल्ह्यात १५० कोटींचे विकास नियोजन

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १२ :** गडचिरोली जिल्ह्यात खनिज उत्खननामुळे प्रभावित ग्रामीण व आदिवासी भागातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत तब्बल १५० कोटी रुपयांचे व्यापक विकास नियोजन करण्यात आले आहे. या निधीचा वापर नवीन मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करत प्रत्यक्ष (खनिज उत्खनन स्थळांपासून १५ किमी पर्यंत) तसेच अप्रत्यक्ष (१५ किमी ते २५ किमी पर्यंत) खनिज प्रभावित क्षेत्रांतील नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी करण्यात येणार आहे.

या नियोजनांतर्गत उच्च प्राधान्य बाबींमध्ये कृषी, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, आरोग्य, शिक्षण, रोजगार निर्मिती, कौशल्य विकास, पर्यावरण संरक्षण आणि मूलभूत सेवा या क्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच महत्त्वपूर्ण रस्ते, सिंचन सुविधा, पर्यावरण संवर्धन, नगर विकास आणि सामाजिक पायाभूत सुविधा उभारणीसाठी विविध प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत.

**आरोग्य सुविधांचा विस्तारः** आरोग्य सेवांमध्ये सुधारणा करण्यासाठी उपकेंद्र स्तरावर प्रसूतीगृहे, मोबाईल रक्त संकलन युनिट, मोबाइल एक्स-रे स्क्रीनिंग युनिट, अतिरिक्त रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. एटापल्ली ग्रामीण रुग्णालयाचे सक्षमीकरण, ३३ आरोग्य उपकेंद्रे व ५ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये जलशुद्धीकरण यंत्रे बसविण्याचे काम करण्यात येणार आहे.

**कृषी व सिंचन विकासः** कृषी क्षेत्रात सिंचन सुविधा, सौर ऊर्जा पंप, मका व कापूस औजार बँक, सौरऊर्जेवर चालणारे कुंपण यांसारखे प्रकल्प राबविले जाणार आहेत.

**शिक्षण आणि कौशल्य विकासः** गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी स्मार्ट शाळा व डिजिटल वर्गखोल्या उभारल्या जाणार आहेत. उपजीविकेसाठी कुक्कुटपालन, महिलांसाठी ई-कार्ट, पोहा व टोरी प्रक्रिया केंद्र उभारण्याचे प्रकल्प प्रस्तावित आहेत. एटापल्ली येथे युवकांसाठी कौशल्य प्रशिक्षण केंद्राची स्थापना होणार आहे.

**नगर विकास आणि पर्यावरण संवर्धनः** नगरपरिषद व नगरपंचायतींसाठी कचरा संकलन वाहने, एटापल्ली तलावाचे पुनरुज्जीवन व सौंदर्यीकरण, सौर लाईट बसविणे, वृक्षलागवड, मृदा व जलसंधारणाची कामे राबविण्यात येतील.

**पायाभूत सुविधा आणि दीर्घकालीन नियोजनः** महत्त्वपूर्ण रस्त्यांचे मजबुतीकरण आणि इतर पायाभूत सुविधांची उभारणी केली जाईल. जिल्ह्यातील सर्व खाणबाधित क्षेत्रांच्या दीर्घकालीन विकासासाठी पंचवार्षिक आराखडा व वार्षिक योजना तयार करण्याचे काम सुरू असून, ती जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या राष्ट्रीय संकेतस्थळावर अपलोड केली जाणार आहे.

जिल्हा प्रशासनाने सर्व संबंधित विभागांना प्रकल्प वेळेत आणि प्रभावीरीत्या पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. अंमलबजावणीच्या प्रगतीवर नियमित पुनरावलोकन आणि मूल्यांकन केले जाणार आहे, ज्यामुळे खनिज उत्खननामुळे प्रभावित भागातील नागरिकांच्या जीवनमानात सामाजिक व आर्थिक विकासातून सकारात्मक बदल घडविणे शक्य होईल, असे जिल्हा खनिकर्म अधिकारी डॉ. इम्रान शेख यांनी कळविले आहे.

# वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय बांधकामाल तत्काळ मंजुरी द्या

### जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन: डॉ. होळी यांची मागणी



**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १२ :** नवनिर्मित शासकिय वैद्यकिय महाविद्यालय गडचिरोली या संस्थेची जागा डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विज्ञान केंद्र व कृषी संशोधन केंद्र गडचिरोली १५ हे. आर, (३७,०६ एकर) जागा परत करण्याची प्रक्रियेला तात्काळ स्थगिती देऊन नविन वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय बांधकामाला तात्काळ मंजूरी देण्यात यावी, अशी मागणी भाजप प्रदेश उपाध्यक्ष माजी आमदार डॉ. देवराव होळी यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये गडचिरोलीला सुपरपेशालीस्ट हॉस्पीटलला मान्यता मिळाली होती. परंतु मी त्यावेळी आमदार होतो आणि १७ वर्षे वैद्यकीय अधिकारी म्हणून काम केला होता, म्हणुन सुपरपेशालीस्ट हॉस्पीटलला व मेडीकल कॉलेजचे फायदे मला माहीत होते. त्यामुळे महाविकास आघाडी सरकारमध्ये गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे होते. त्यावेळी त्यांना घेराव, चक्काजाम, आंदोलन १ महीना केला होता. पुन्हा महायुतीचे सरकार स्थापन झाल्यावर त्यावेळचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हटले कि डॉ. तु आंदोलन केला म्हणून महाराष्ट्रातील पहीला मेडीकल कॉलेज गडचिरोली घोषणा केलेले होते. म्हणुन गडचिरोली येथील मेडीकल कॉलेज व हॉस्पीटला जागा कमी पडणार आहे, वनविभागाची जागा मिळण्यासाठी खुप वेळ लागणार आहे. नवनिर्मित शासकिय वैद्यकिय महाविद्यालय गडचिरोली या संस्थेच्या नावाने जागा झालेली आहे. तिच जागा कायम ठेवून नविन वैद्याकिय महाविद्यालय व रुग्णालय बांधकामास तात्काळ मंजूरी देण्याबाबत देण्यात यावी, अशी मागणी भाजप प्रदेश उपाध्यक्ष माजी आमदार डॉ. देवराव होळी यांनी उपजिल्हाधिकारी गडचिरोली यांना रीतसर निवेदन देऊन पाठपुरावा करण्याचे सूचना केली. याप्रसंगी भाजप जिल्हा सचिव दिलीप चलाख उपस्थित होते.

## ‘हर हर महादेव’च्या गजरात निघाली कावड यात्रा

### शिवभक्त, महिला, बालगोपांचा उत्स्फुर्त सहभाग



**तालुका प्रतिनिधी**
**कुरखेडा दि. १२ :** स्थानिक हनूमान मंदिर देवस्थान येथून पवित्र श्रावण सोमवारचे औचित्य साधत सोमवार ११ ऑगस्ट रोजी भोलेनाथ भक्तांचा वतीने कुरखेडा शहरात दिंडीचा सूरात व ‘बम बम भोले’, ‘हर हर महादेव’चा गजर करीत कावड यात्रा यात्रा काढण्यात आली.

हिंदू धर्मात व विशेषता महाराष्ट्र राज्यात श्रावण मासातील सोमवारला विशेष महत्व आहे. भगवान शिव ला प्रसन्न करण्याकरीता या दिवशी उपवास विशेष आराधणा करण्यात येत. सूख समृद्धि करीता आशिर्वाद प्राप्त करण्यात येते. श्रावण मासातील तिसऱ्या सोमवारी येथील हनूमान मंदिर देवस्थानात कलश पूजा व भोलेनाथाची आराधणा करीत कावड यात्रा काढण्यात आली. यावेळी ‘बम बम भोले’, ‘हर हर महादेव’,‘श्री शिवाय नमस्त्यूभ्यम’चा गजर करीत भोलेनाथाला प्रसन्न करण्यात आले.

याप्रसंगी भोलेनाथ भक्त सूरेंन्द्रसिंह चंदेल, चांगदेव फाये, पंडित अविनाश दूबे महाराज, उल्हास देशमुख, हनूमान मंदिर देवस्थानचे सचिव श्याम लांजेवार, दूर्गेश देशमुख, अतूल चव्हाण, सार्वजनिक हनुमान मंदिर धार्मिक कार्य महिला समीती अध्यक्ष शारदा गाथाडे, उपाध्यक्ष कविता खडसे, सचिव अश्विनी पिंपळकर, सहसचिव वनिता थोटे, कोषाध्यक्ष ज्योती उईके, सदस्य अल्का गिरडकर, अल्का दूबे, अल्का बावनथडे, अर्चणा देशमुख, गरमडे, गायत्री बारसागडे, मिनाक्षी नेवारे, नाईक, गिता बैस, प्रिती नाकतोडे, रंजना जूमनाके, रेखा रासेकर, शूभांगी जल्लेवार, सूधा नाकाडे, नर्मदा डेकाटे, भाग्यश्री नेवारे, शिला मेश्राम, रोषणी चव्हाण, निर्मला उईके, सूषमा ऊईके तसेच भोलेनाथ भक्त मोठ्या संख्येत सहभागी झाले होते.

## लाचखोर तहसीलदार जैस्वाल यांना विरोध

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १२ :** बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा येथे कार्यरत असतांना तेथील रेती तस्करांकडून ३५ हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात रंगेहाथ पकडण्यात आलेले तहसीलदार सचिन जैस्वाल यांना गडचिरोली तहसीलदार पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यास शेतकरी कामगार पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि आझाद समाज पक्षाने आक्षेप घेत विरोध दर्शविला आहे.

शेकाप नेते भाई रामदास जराते, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव कॉ. अमोल मारकवार आणि आझाद समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष राज बन्सोड यांनी संयुक्तपणे जिल्हाधिकारी यांना लिहिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गडचिरोलीचे तहसीलदार संतोष आष्टीकर यांची शासनाने गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालयातील तहसीलदार (संगायो) या रिक्त पदावर शासनाने नियुक्ती केली. त्यामुळे गडचिरोली तहसीलदार हे पद रिक्त झाले होते. त्यामुळे दिनांक ८ ऑगस्ट रोजी आपण जिल्हाधिकारी कार्यालयातील तहसीलदार (आस्था) सचिन जैस्वाल, यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्याबाबत आदेश केलेले आहेत. मात्र सचिन जैस्वाल, तहसीलदार (आस्था) हे यापूर्वी बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा येथे कार्यरत असतांना तेथील रेती तस्करांकडून लाच घेताना अडकले होते. यावेळी त्यांच्या निवासस्थानी ३७ रक्कम व त्यांच्या परभणी येथील राहत्या घरी ९ लाख ४० हजार रुपयांची अशी एकूण ४६ लाख ९२ हजार १८० रुपयांची रोख बेहिशोबी संपत्ती आढळून आली होती.त्यानंतर शासनाने त्यांना शिक्षा म्हणून गडचिरोली येथे नियुक्ती दिलेली होती. असे असतांना जिल्ह्याच्या मुख्यालय असलेल्या गडचिरोली तहसीलदार पदाचा सचिन जैस्वाल यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविणे योग्य नसून येथील रेती तस्करीला वाव देण्यासारखे असल्याची टीकाही त्यांनी केली आहे. अशाने जिल्हा कसा काय प्रगतीपथावर नेणार? असा प्रश्न उपस्थित डाव्यांनी केला आहे.

### भ्रष्ट अधिकारी जिल्ह्यात नको, अन्यथा आंदोलन

जिल्ह्यात भ्रष्ट आणि शिक्षकेवर असलेले अधिकारी कारभार सांभाळणार असतील तर आम्ही ही सहन करणार नसून लाचखोर तहसीलदार सचिन जैस्वाल यांच्याकडील तहसीलदार पदाची जबाबदारी तातडीने काढून न घेतल्यास तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन छेण्याचा इशाराही, भाई रामदास जराते, कॉ. अमोल मारकवार, राज बन्सोड यांनी दिला आहे.

## गडचिरोलीत निघाली ‘हर घर तिरंगा’ रॅली

### विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था व नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग



**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १२ :** स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने सन २०२२ पासून सुरू केलेल्या ‘हर घर तिरंगा’ या जनचळवळ मोहिमेला यावर्षीही गडचिरोली शहरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. लोकांच्या मनामध्ये देशभक्तीची भावना जागृत करणे व भारतीय राष्ट्रध्वजाबद्दल जनजागृती करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश असून, सन २०२५ मध्ये २ अहगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधीत राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

नगर परिषद गडचिरोलीच्या वतीने मंगळवारी शहरात तिरंगा सायकल रॅलीचे भव्य आयोजन करण्यात आले. रॅलीची सुरुवात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृह, इंदिरा गांधी चौक येथून झाली. हातात तिरंगा घेऊन, देशभक्तीपर घोषणा देत शहरातील मुख्य मार्गावरून निघालेली ही रॅली नागरिकांचे लक्ष वेधून घेत होती.

रॅलीत नगर परिषदेचे कर्मचारी यांचेसह शहरातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी, प्राध्यापक, सायकल स्नेही मंडळ, क्रीडापटू, स्वयंसेवी संस्था, स्थानिक लोकप्रतिनिधी, तसेच मोठ्या संख्येने गडचिरोलीकर नागरिक सहभागी झाले. रॅलीचा समारोप एकता पार्क येथे झाला, जिथे सहभागींसाठी लघु देशभक्तीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## गडचिरोली रानभाजी महोत्सव उद्या

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १२ :** कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) द्वारे गडचिरोली येथे रानभाजी महोत्सवाचे आयोजन १४ ऑगस्ट रोजी दुपारी एक वाजता कृषी चिकित्सालय सोलापूर गडचिरोली येथे करण्यात आले आहे.

या रानभाजी महोत्सवाचे उद्घाटन राज्याचे कृषी राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी खासदार डॉ. नामदेव किरसान, आमदार धर्मरावबाबा आत्राम, आ. डॉ. मिलिंद नरोटे, आ. रामदास मसराम जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे, कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. किशोर झाडे, कृषी महाविद्यालयाच्या सहयोगी अधिष्ठाता डॉ. माया राऊत उपस्थित राहणार असल्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तथा आत्माच्या प्रकल्प संचालक प्रीती हिरळकर यांनी कळविले आहे.

## आमदार डॉ. नरोटे यांनी घेतला जिल्हा स्टेडियमचा आढवा



**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १२ :** येथील जिल्हा स्टेडियमचे काम संथगतीने सुरु असल्याने आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांनी सोमवारी (दि. ११) स्टेडियमला भेट देवून बांधकामाच्या गतीचा आढावा घेतला.

पाहणीदरम्यान, आमदार डॉ. नरोटे यांनी स्टेडियमच्या दोन्ही नवीन इमारतींचे निरीक्षण केले. कामाचा वेग, गुणवत्ता आणि आवश्यक साहित्याची उपलब्धता याबद्दल माहिती जाणून घेतली. अपूर्ण काम तात्काळ पूर्ण करण्याचे निर्देश दिले. संबंधित कंत्राटदाराला ऑगस्ट महिन्यातच दोन्ही इमारतींचे काम पूर्ण करण्याचे आणि कामाचा दर्जा राखण्याचे कडक आदेश दिले. आमदार डॉ. नरोटे यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा करताना, काम निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा आणि परवानग्या वेळेवर देण्यावर भर दिला. जनतेच्या सोयीसाठी आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेसाठी हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी संबंधितांना दिल्या. यावेळी भाजयुमोचे माजी जिल्हाध्यक्ष अनिल तिडके, अंकुश पवार, जिल्हा क्रीडा मार्गदर्शक एस. बी. बडकेलवार, साबां विभागाचे डोंगे, रूपाली काळे उपस्थित होते.

## मनिषा मडावी पुरस्काराने सन्मानित



**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १२ :** आदिवासी विकास विभाग अप्पर आयुक्त महाराष्ट्र शासनद्वारे राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्या हस्ते गडचिरोली येथील येथील राष्ट्रीय मानवाधिकार संघटना जिल्हाध्यक्षा मनीषा मडावी यांना सक्षम आदिवासी महिला या सन्मानाने पुरस्कृत करण्यात आले.

मनीषा मडावी यांनी आजपर्यंत मिस इंडिया २०२१, मिसेस महाराष्ट्र महाराष्ट्र २०२२, सुपर मॉडेल रवी वॉक टायटल ऑफ इंडिया २०२२, फिनिक्स पुरस्कार २०२३, आदिवासी महिला नवरत्न पुरस्कार, मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण पुरस्कार, गडचिरोली गौरव पुरस्कार २०२१, आदिवासी समाज भूषण पुरस्कार २०२२, कलारत्न पुरस्कार २०२३ अगदी कमी वयात सदर पुरस्कार कर्तृत्वाने आपल्या नावे केलेले आहेत. आदिवासी समाजाची संस्कृती परंपरा ही जगासमोर आली पाहिजे व आदिवासी कला परंपरा राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर गेली पाहिजे, याकरिता त्यांनी जिल्ह्यात आयोजित केलेला ‘कोया किंग’ आणि ‘कोया क्वीन’ स्पर्धेचे उत्कृष्टरित्या आयोजन केले. या आयोजनाचे राष्ट्रीय स्तरावर सुद्धा दखल घेतली गेली. या कार्याची दखल घेऊन आदिवासी समाजातील महिलांना प्रेरणा देण्याचे काम करत असल्याने आदिवासी विकास विभाग अप्पर आयुक्त महाराष्ट्र शासन यांनी जागतिक आदिवासी दिनानिमित्त विरांगणा राणी दुर्गावती महिला, सबलीकरण सक्षमीकरण मेळावात कविवर्य सुरेश भट सभागृह रेशीम बाग नागपूर येथे सक्षम आदिवासी महिला सन्मान व पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

राष्ट्रीय मानवाधिकार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. प्रणय खुणे, प्रदेश उपाध्यक्ष डॉ. भारत खटी, राहुल झोडे, प्रवक्ता ग्यानेंद विश्वास, राष्ट्रीय महिला आघाडी अध्यक्षा पौर्णिमा विश्वास, विदर्भ कार्यकारी अध्यक्ष नेताजी सोदोंरकर, विदर्भ अध्यक्ष जावेद सैय्यद, जिल्हा अध्यक्ष रमेश अधिकारी, जिल्हा सचिव प्रकाश थुल, जिल्हा उपाध्यक्ष नानु उपाध्ये, बाळू माडुरवार, तालुका अध्यक्ष कालिदास बन्सोड, भीमराव वनकर, तालुका अध्यक्षा रुपाली कावळे, विशाखा सिन्हा मनीषा मडावी यांचे अभिनंदन केले आहे.

### जाहीरनामा

श्री. राकेश दशरथ कुळमेथे रा. चेरपल्ली, ता. अहेरी जिल्हा गडचिरोली येथील रहिवासी असून यांचा मुलगा कुमार रुदांश राकेश कुळमेथे यांचा जन्म मौजा चेरपल्ली तह. अहेरी जिल्हा गडचिरोली येथे दिनांक ३०/०५/२०२४ रोजी झाला असुन त्यांचे जन्म नोंद रेकार्ड वर नाव उपलब्ध नसल्याने त्यांनी जाहिरनामा प्रसिद्ध करण्याबाबत तहसिलदार साहेब अहेरी यांचाकडे अर्ज सादर केले असुन कोणाचे आक्षेप असल्यास १५ दिवसाच्या आत नगर पंचायत अहेरी किंवा कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, अहेरी येथे नोंदवावे.

### जाहीरनामा

**कोर्ट विद्यमान ३ रे सह. दिवाणी न्यायाधीश(क.स्तर) गडचिरोली यांच्या न्यायालयात**

**पेशी तारीख : ०२/०९/२०२५**
**निशाणी क्रमांक - ०७**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १५९/२०२५**

**अर्जदारः** १) उद्धव कैकाडू शेरकी, वय -४४ वर्षे, व्यवसाय - शेतमजुरी, २) मुकुंदा कैकाडू शेरकी, वय-५० वर्षे, व्यवसाय- शेतमजुरी, ३) ताराबाई कैकाडू शेरकी, वय-७४ वर्षे, व्यवसाय - काही नाही, अर्जदार क्र. १ ते सर्व रा. हनुमान मंदिर जवळ, गोकुळनगर वार्ड क्र. २३, गुरूनानक चौक, गडचिरोली, तह.जि. गडचिरोली. ४) सौ. ललीताबाई भरत ठाकूर, वय -४८ वर्षे, व्यवसाय- मजुरी रा. तळोधी (मा), ता. चामोर्शी, जि. गडचिरोली.

-: विरुध्द :-

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्व आम जनतेस याद्वारे सुचित करण्यात येते की, मृतक नामे कैकाडू रामा शेरकी यांचा मृत्यू दिनांक १९/०३/१९९८ रोजी आजारपणामुळे जिल्हा सामान्य रूग्णालय, गडचिरोली येथे झाला असून वरील अर्जदाराने उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदर अर्जावर कुणाची उजर वा हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून एक महिन्याचे आत स्वतः किंवा आपले वकिलामार्फत वा योग्य मुखत्यारामार्फत आपला लेखी उजर वा हरकत दाखल करावी, अन्यथा तद्नंतर हे न्यायालय सदर्हु अर्जदाराचा पुरावा घेवून दावा करण्याकरिता अर्जावर योग्य तो निर्णय देईल.

सबब जाहीर नोटीस दिनांक ११ माहे ऑगस्ट, २०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय (व.स्तर)**
**गडचिरोली**

# खड्डेमुक्त रस्त्यासाठी शिवसेना करणार चक्काजाम

### शिवसेना (शिंदे) गटाच्या पदाधिकाऱ्यांचे तहसीलदार व पोलिस प्रशासनाला निवेदन



**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १२ :** मुलचेरा तालुक्यातून अहेरी उपविभागाला जोडणारा व तालुक्यातनच जिल्ह्या जोडणाऱ्या प्रमुख रस्त्यांची झालेल्या बकाल अवस्थेला व तालुक्यातील प्रमुख रस्त्याला खड्डेमुक्त करण्यासाठी शिवसेना (शिंदे) गटातर्फे २१ ऑगस्ट रोजी मुलचेरा तालुक्यातील गोमनी येथील प्रमुख चौकात येणाऱ्या खड्डेमुक्त रस्त्यासाठी चक्का जाम आंदोलन करण्यात येणार आहे. याबाबत तहसीलदार व पोलिस प्रशासनाला निवेददन देण्यात आले.

शिवसेना (शिंदे ) तर्फे जिल्हा प्रमुख राकेश बेलसरे यांच्या मार्गदर्शनात युवा नेता अहेरी विधानसभा संदीप कोरेत यांच्या उपस्थितीत तालुका प्रमुख गौरव बाला यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार मुलचेरा यांना १८/७/२०२५ ला निवेदन देण्यात आले होते. पण या निवेदनाची साधी दखल सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतली नाही. काही दिवसापूर्वी जिल्हाधिकारी गडचिरोली अहेरीत आले असता उपविभागातील बकाल रस्त्याची असलेली अवस्था बघून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यप्रणाली नाराजी व्यक्त करत चांगलेच धारेवर धरले होते. तरी पण सार्वजनिक बांधकाम विभाग बेजबाबदार पने वागत असल्यामुळे त्याचा बेजबाबदारी पणाचा फटका या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या टू व्हीलर आणि फोर व्हीलर धारकांना बसत आहे. बस वेळेवर येत नसल्यामुळे शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना, गरोदर मातांना होत असल्यामुळे रस्त्याच्या या बकाल अवस्थेमुळे जनमाणसात सार्वजनिक बांधकाम विभाग तीव्र नाराजी वाढत चालली आहे. त्यामुळे याचा उद्रेक २१ ऑगस्ट रोजी गोमनी येथील चौकातील आलापल्ली- मुलचेरा महामार्गावर शिवसेनेचा चक्का जाम आंदोलनाने होणार आहे. या आंदोलनात तालुक्यातील शेकडो लोकांनी सहभागी व्हावे, असे आव्हान शिवसेना (शिंदे) मुलचेरा तालुक्यातर्फे करण्यात आले आहे.

निवेदन देताना आदिवासी सेल तालुका प्रमुख मुलचेरा नितेश मेश्राम, विनोद बानोत, जिल्हा अशाकीय सदस्य बंजारा व लभाना समाजाचे वेंकटेश गजलवार, विक्रम बावणे, अजय बानोत ,दिपक घुगलोत, शिमोन घुगलोत, दयाकर बोळा, नरेश राठोड, धर्मराव खोब्रागडे, सदाशिव सेडमाके, शामराव खोब्रागडे, अशोक कांबळे, लक्ष्मण मुजमकर, गुरुदास खोब्रागडे, मनोहर सेडमाके, शिवसेना कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PNINO-MAHAMAR 2010585
महासागर गडचिरोली
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, एकदा मार्केट, चामोर्शी रोड, गडचिरोली येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१/९९२२९७००२३ स्थानिक संपादक नरेंद्र माहेश्वरी फोन ९९२२९७००३६/०७१३२२३२७७३ (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहिल.)

# देवभूमी विकासाकडून विनाशाकडे

उत्तरकाशीत धराली येथे मोठी धगफुटी झाली. हाहाःकार उडाला. किती मृत्युमुखी पडले, किती अतिवृष्टी व पुरात वाहून गेले, किती ढिगाऱ्याखाली गाडले गेले याचा आकडा चार दिवसानंतरही समजला नाही. ढगफुटीनंतर संपूर्ण डोंगरच खाली कोसळला नि अख्खे गावच धरणीच्या उदरात गडप झाले. ढगफुटीनंतर निसगाचा कोप होऊन डोंगरच कोसळून गावाला घेऊन गेल्याची ही काही पहिलीच घटना नव्हे. आता गावच शिल्लक नाही तर तिथे शोधणार तरी काय? सापडणार तरी काय? घरेदारे, इमारती, वस्त्या सारेच ढगफुटीत वाहून गेले.

---------------





उत्तराखंड ही देशात देवभूमी म्हणून ओळखली जाते. गेल्या काही वर्षात निसर्गाचा वारंवार कोप झेलणारी संकट भूमी बनली आहे. अतिवृष्टी, जमीन खचणे, जमीन दुभंगणे, ढगफुटी, महापूर, नदीचा मार्ग बदलणे अशा संकटांनी देवभूमीला घेरले आहे.

दरवर्षी पावसाळ्यात देवभुमितील एक तरी गाव उजाड होत आहे. निसर्गाच्या कोपापुढे सरकार हतबल झाल्यासारखे दिसत आहे. जनता मात्र असहाय्य व अस्वस्थ आहे.

सन २०१३ मधे उत्तराखंडवर असेच नैसर्गिक संकट कोसळले होते. पण त्यापासून सरकारने काहीच बोध घेतला नाही असे म्हणावे लागेल. उत्तर प्रदेशचे विभाजन करून ९ नोव्हेंबर २००० रोजी उत्तराखंड राज्याची निर्मिती करण्यात आली. राज्यात तेरा जिल्हे असून २०११ च्या जनगणनेनुसार १ कोटी ११ लाख लोकसंख्या आहे.

भागिरथी, अलकनंदा, गंगा, यमुना असा मोठ्या व पवित्र नद्यांचे उगमस्थान असलेली देवभूमी हे देशातील कोट्यवधी भाविकांचे श्रध्दास्थान आहे. उत्तरखंड स्वतंत्र राज्य निर्माण होण्याअगोदर या प्रदेशात झाडे तोडायला मनाई होती.

नद्यांच्या काठावर हॉटेल्स किंवा निवासी बांधकामाला मनाई होती. मात्र स्वतंत्र राज्य झाल्यापासून नद्यांच्या किनाऱ्यांवर हॉटेल्सच्या रांगा उभ्या राहिल्या आहेत. .निवासी इमारतींची सर्वत्र गर्दीच गर्दी आहे. आजही पाच हजार गावात पोचायला रस्ते नाहीत पण पर्यटन व धार्मिक स्थळांच्या परिसरात इमारती, रस्ते, हॉटेल्स, दुकाने, सर्व सेवा सुविधांची गर्दीच गर्दी आहे.

ज्याला विकास म्हटले जाते, अशा अनेक योजना उत्तराखंडमधे राबवल्या जात आहेत. बांधकामे जोरात आहेत. उंच इमारती उभारल्या जात आहेत. सर्वत्र झाडांची बेसुमार कत्तल चालू आहे. इमारती व रस्ते उभारण्यासाठी सुरूंग लावून डोंगर खोदले जात आहेत.

डोंगर फोडून मोठ मोठे बोगदे खणले जात आहेत. हे सर्व पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी व पर्यटन व्यवसायाला भरभराट यावी या हेतूने बांधकामे चालू आहेत. हिमालयाच्या कुशीत असलेल्या देवभूमीवर सिमेंट कॉक्रीट व सुरूंगाचा अत्याचार चालू आहे. चौफेर इमारतींचे भार लादले जात आहेत.

देवभूमीत रोज हजारो मोटारी, बसेस आणि हजारोच्या संख्येने पर्यटक येत असतात. त्यांच्या सोयी सुविधांसाठी रस्ते, इमारती, हॉटेल्स, मोटेल्सची सर्वत्र बांधकामे चालू आहेत. ही मालिका गेली दोन दशकांहून अधिक काळ चालूच आहे. कितीही इमारती , रस्ते, हॉटेल्स उभारली तरी कुणाचेच समाधान होत नाही.

देवभूमीला जसे पर्वतांनी घेरले आहे तसेच पर्यटकांच्या गर्दीमुळे प्लॅस्टिकचे ढिग जिकडे तिकडे बघायला मिळत आहेत. वाहनांची गर्दी, मोटारींच्या रांगांनी देवभूमिच्या पर्यावरणावर घाला घातला आहे. सर्वत्र वाहतुकीची कोंडी आहे. उन्हाळ्यातही उत्तराखंडमधील जनतेला कधी घरात, कार्यालयात वा दुकानात पंखा लावण्याची गरज भासत नव्हती. आता सर्वत्र दिवसरात्र एअर कंडिशन्ड चालू असतात. एअर कंडिशन्ड शिवाय एक दिवसच काय पण एक तासही राहू शकत नाही, अशा पर्यटकांनी देवभूमीत गर्दी केली आहे.

देवभूमीत बाहेरच्या धनाढ्य लोकांनी जमिनी खरेदी करण्याचा सपाटा लावला आहे. जमिनीच्या खरेदीविक्रीवर कोणतेही ठोस निर्बंध नाहीत. जमिनी खरेदी करायच्या व बंगले किंवा घरे बांधायची ही तर फॅशनच बनली आहे. गेल्या काही वर्षात देशातील अन्य शहरांप्रमाणे येथेही हौसिंग कॉलनीज उभ्या राहू लागल्या आहेत. अन्य राज्यातील लोक देवभूमीत फ्लॅट खरेदी करीत आहेत. हे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

इंडिया कॉलिंग
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

परप्रांतीयांच्या अतिक्रमाणामुळे स्थानिक संस्कृती आणि भाषा यावर गंडातर आल्याची चर्चा सुरू झाली आहे. एकेकाळी उत्तराखंड हा प्रदेश साधू संतांची भूमी म्हणून ओळखला जात होता आणि उत्तराखंडला रिअल इस्टेट माफियांनी वेढले आहे. येथील सामान्य जनतेच्या मालकीच्या जमिनी कवडी मोल भावाने खरेदी केल्या जात आहेत. गरीब जनतेची लुट केली जात असतानाही सरकार मौनीबाबाच्या भूमिकेत आहे, याचेच मोठे आश्चर्य वाटते.

दिल्ली ते उत्तराखंड एक्स्प्रेस वे उभारण्यात येणार आहे. याचा दुसरा अर्थ उत्तराखंडचे प्रवेशव्दार केवळ भाविकांनाच किंवा पर्यटकांना नव्हे तर धनाढ्य लोकांना खुले केले जाणार आहे. एक्स्प्रेस वे म्हणजे विकासाचा मार्ग अशा वल्गना केल्या जात आहेत, पण देवभूमीला तो विनाशाकडे नेणारा ठरेल असे पर्यावरण रक्षकांना वाटते. आजच रोज हजारो मोटारी देवभूमीत येऊन थडकत आहेत.

दिल्ली- उत्तराखंड एक्सप्रेस वे झाल्यानंतर दर शनिवार- रविवारी आणि सुट्टीच्या दिवशी लाखो मोटारी देवभूमीच्या पर्वतांवर धावत येतील. त्यातून पर्यावरण ध्वस्त होईल आणि देवभूमीचे व्यापारीकरण झालेले बघायला मिळेल. यात स्थानिक माणूस, स्थानिक भाषा, स्थानिक परंपरा, शांतता, सुव्यवस्था, पर्यावरण, निसर्ग सौंदर्य सर्वकाही विनाशाकडे जाईल.

उत्तराखंड या पर्वतीय राज्याची क्षमता किती आहे, लोकांची गर्दी आणि वाहनांची संख्या किती असावी यावर कुठे नियंत्रण नको का? देवभूमीतील काँक्रीटची बांधकामे थांबवावीत अशा मागणने जोर धरला आहे. विकास योजनांचा भार देवभूमी किती सहन करू शकणार, याचीही मर्यादा ओळखून त्याचे उल्लंघन होणार नाही यासाठी कठोर लक्ष्मण रेषा आखणे जरूरीचे आहे.

जमिनीनीच्या खरेदी विक्रीवर कडक निर्बंध लादणे आवश्यक आहे. स्थानिक लोकांच्या भागीदारीशिवाय कोणताही निर्णय घेता येणार नाही हे तत्व पाळले तर परप्रांतीयांचे अतिक्रमण व स्थानिकांची गळचेपी थोपवता येईल अशी देवभूमी बचाव म्हणणाऱ्यांची भावना आहे.

जलावायु संकट आणि पर्यावरण जागृकता याचे शिक्षण शाळेपासूनच मुलांना देण्याची वेळ आली आहे. झाडे केवळ प्राणवायु देत नाहीत तर पर्वतांचा भक्कम आधार असतात आणि नदी केवळ पाणी देत नाही तर त्या जीवन देतात अशी शिकवणूक बालपणापासून देणे गरजेचे आहे. पर्वतांच्या रांगा म्हणजे दगडांचे डोंगर नसतात तर ती इतिहास, भूगोल आणि संस्कृतिची प्रतिके असतात ही शिकवणूक मुलांच्या मनावर बिंबवली पाहिजे.

ढगफुटीमधे धराली गाव जमिनदोस्त झाले तेव्हा गावाबाहेर असलेले व वाचलेले लोक आपल्या कुटुंबियांना चिखलातून, दलदलीतून आणि दगड धोंड्यांच्या ढिगातून शोधण्यासाठी जीवाचे रान करीत होते. धरालीवर आलेले संकट ही काही शेवटची घटना नव्हे, विकासाच्या नावाखाली देवभूमीवर यापुढेही अतिक्रमण व अत्याचार रहाणार असतील तर हल्द्वानी, देहराडून किंवा मसुरी, कोणतेच गाव किंवा शहर सुरक्षित राहणार नाही.

# इंडिया आघाडीची ममतांना गरज का आहे?

नुकत्याच पार पडलेल्या इंडिया आघाडीच्या बैठकीत कॉंग्रेस आणि तृणमूल कॉंग्रेस या पक्षांमध्ये वेगळीच केमेस्ट्री पहायला मिळाली.राहुल गांधी आणि तृणमूल कॉंग्रेसचे सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांच्यातील जवळीक वाढल्याचे त्यांच्यामध्ये झालेल्या संवादातून दिसून आले.

लोकसभेतील संख्या बळानुसार तृणमूल कॉंग्रेस हा इंडिया आघाडीतील तिसऱ्या क्रमांकाचा पक्ष आहे त्यामुळे राहुल गांधी हे तृणमूल कॉंग्रेसचे महत्व जाणून आहेत. मात्र तृणमूल कॉंग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांचा आक्रमक स्वभाव लक्षात घेता, तृणमूल कॉंग्रेस आणि कॉंग्रेस यांच्यातील संबंध नेहमीच चढउताराचे राहिले आहेत. याला कारण अर्थातच पश्चिम बंगालमधील त्यांचे राजकारण हेच आहे.

पश्चिम बंगालमध्ये २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत, इंडिया आघाडीतील या घटक पक्षांमध्ये निवडणूक समझोता होऊ शकला नव्हता. ममता बॅनर्जी यांनी पश्चिम बंगालमधील लोकसभेच्या एकूण ४२ जागांपैकी केवळ २ जागा कॉंग्रेसला सोडण्याची तयारी दर्शवली होती.



अभय गोखले

कॉंग्रेसला अर्थातच ते मान्य झाले नाही आणि त्यांच्यातील जागा वाटपाची बोलणी फिसकटली. नंतर कॉंग्रेसने मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालील डाव्या आघाडीशी निवडणुक समझोता केला आणि लोकसभेची एक जागा जिंकली.

कॉंग्रेस आणि तृणमूल कॉंग्रेस यांच्यातील जागा वाटपाची बोलणी अयशस्वी ठरली त्याला ममतांची ताठर भूमिका कारणीभूत होतीच शिवाय पश्चिम बंगालमधील कॉंग्रेसचे तत्कालीन प्रदेशाध्यक्ष अधिररंजन चौधरी हेही तितकेच त्यासाठी कारणीभूत ठरले.

ममता बॅनर्जी आणि अधिररंजन चौधरी यांच्यातील मतभेद कधीच लपून राहिलेले नाहीत. ममता बॅनर्जी यांच्यावर टीका करण्यात ते नेहमीच आघाडीवर राहिले आहेत. कॉंग्रेसचे नेतृत्व ममतांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करत असताना, अधिररंजन चौधरी हे ममतांवर टिका करून, कॉंग्रेसचे काम अवघड करत होते. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत अधिररंजन चौधरी यांचा बेहरामपूर मतदार संघातून पराभव झाला आणि त्यांचे महत्त्व पुर्वीसारखे राहिले नाही.

कॉंग्रेस नेतृत्वाने लोकसभा निवडणुकीनंतर अधिररंजन चौधरी यांची प्रदेशाध्यक्ष पदावरुन उचलबांगडी केली आणि त्यांच्या जागी शुभंकर सरकार यांची नियुक्ती केली. शुभंकर सरकार हे सौम्य स्वभावाचे असून, त्यांनी ममता बॅनर्जी यांच्यावर वैयक्तिक टिका करण्याचे टाळले आहे.

ममता बॅनर्जी यांचे भाचे अभिषेक बॅनर्जी हे ममतांचे राजकीय वारसदार समजले जातात.ते पक्षाचे सरचिटणीस तर आहेतच शिवाय त्यांच्याकडे नुकतीच आणखी एक महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. लोकसभेतील तृणमूल कॉंग्रेसचे गटनेतेपद अभिषेक बॅनर्जी यांच्याकडे सोपविण्यात आले आहे.

पश्चिम बंगालमध्ये सध्या भाषावाद राजकारणाच्या केंद्रस्थानी आला आहे.पश्चिम बंगाल मधील जे लोक भारतातील इतर राज्यांत नोकरी धंद्यानिमित्त वास्तव्य करत आहेत, त्यांना तेथे वाईट वागणूक मिळत असल्याचा आरोप ममता बॅनर्जी यांच्याकडून करण्यात आला आहे. त्यांना बांगलादेशी नागरिक ठरवून त्यांचा छळ होत असल्याचा आरोप तृणमूल कॉंग्रेसकडून करण्यात आला आहे.

पुढील वर्षी पश्चिम बंगाल मध्ये विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. त्यानिमित्ताने ममतांच्या हातात चांगलेच कोलीत मिळाले आहे.त्यांनी बंगाली अस्मितेचा मुद्दा हाती घेतला असून भाषा आंदोलन सुरू केले आहे.

बिहारमध्ये एसआयआरची (विशेष सखोल फेरतपासणी) मोहीम निवडणुक आयोगाने हाती घेतली आहे.तशीच मोहीम आता पश्चिम बंगाल मध्ये राबविण्यात येणार आहे. त्याला ममतांचा सक्त विरोध आहे. या मोहीमेमुळे आपल्या व्होट बँकेला धक्का बसेल अशी भीती ममतांना वाटत आहे, त्यामुळे त्या सैरभैर झाल्या आहेत.

अशा परिस्थितीत इंडिया आघाडीतील इतर घटक पक्षांची त्यांना मदत लागणार आहे. तेंव्हा सध्यातरी त्या इंडिया आघाडीशी जुळवून घेण्याच्या मनःस्थितीत दिसत आहेत. इंडिया आघाडीला ममतांची जेवढी गरज आहे, त्यापेक्षा जास्त गरज ममतांना, इंडिया आघाडीची आहे.राहुल गांधी आणि अभिषेक बॅनर्जी यांच्यातील वाढत्या जवळीकीचे तेच मर्म आहे.

■ ■ ■

# मतदार यादीतील गोंधळ लोकशाहीसमोरील गंभीर आव्हान

लोकशाहीची ताकद तिच्या मतदारांमध्ये असते, पण जेव्हा मतदार यादीच प्रश्नचिन्हाखाली येते, तेव्हा निवडणुकीची पारदर्शकता आणि विश्वासार्हता दोन्हीवर गंभीर परिणाम होतो.

सध्या देशभरात मतदार यादीतील गोंधळावरून मोठे राजकीय वादंग सुरू आहे. सत्ताधारी पक्ष वगळता जवळपास सर्वच राजकीय पक्ष निवडणूक आयोगावर सत्ताधाऱ्यांच्या बाजूने काम करण्याचा आरोप करत आहेत. या सगळ्यात देशातील इतर महत्त्वाचे मुद्दे जणू विसरले गेले आहेत आणि फक्त मतदार यादीवर लक्ष केंद्रित झाले आहे.

निवडणूक आयोगाचे म्हणणे आहे की ते मतदार यादीतील डुप्लीकेट आणि बनावट नावे काढून टाकण्याची मोहीम राबवत आहेत, जेणेकरून निवडणुका निष्पक्ष होतील. मात्र, विरोधकांना शंका आहे की ज्या नावांची वगळणी होत आहे, त्यात बहुतेक त्यांचेच समर्थक आहेत. त्यामुळे आयोगाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.



डॉ. प्रवीण डबली
ज्येष्ठ पत्रकार
९४२२१२५६५६

**आरोप आणि उत्तर**

निवडणूक आयोग वारंवार सांगत आहे की कुणाला आरोप करायचे असतील तर पुराव्यासह हलफनामा द्यावा, मात्र विरोधक त्यासाठी तयार नाहीत. राजकीय मंचांवरून सतत ही मागणी होत आहे की मतदार यादीची स्वच्छता पारदर्शकपणे केली जात नाही, तर ती स्वार्थी राजकारणाचा भाग आहे. त्यांनी मागणी केली आहे की मतदार यादीची तपासणी पारदर्शकपणे व्हावी आणि कोणत्याही पक्षाचे नुकसान होऊ नये.

**गोंधळाची मुळे**

१. लोकसंख्येची गतिशीलता झ्र देशात लाखो लोक दररोज रोजगार, शिक्षण किंवा इतर कारणांमुळे एका ठिकाणाहून दुस?्या ठिकाणी जातात, पण जुन्या ठिकाणाहून आपले नाव काढत नाहीत.

२. बनावट कागदपत्रांची सोपी उपलब्धता झ्र बनावट आधार कार्ड, रेशन कार्ड आणि मतदार ओळखपत्र तयार करणे आता अवघड राहिलेले नाही.

३. व्यवस्थेतला भ्रष्टाचार झ्र काही ठिकाणी राजकीय दबाव, स्थानिक नेटवर्क आणि लाचखोरीमुळे खोटी नावे जोडणे किंवा खरी नावे काढून टाकणे घडते.

**सध्याच्या व्यवस्थेची कमजोर कडी**

मतदार ओळखपत्र हा सर्वात सुरक्षित ओळखपत्र मानला जाऊ शकत नाही, कारण त्यातील मोठा भाग अजूनही मॅन्युअल पद्धतीने भरला जातो.

आधार काडार्शी लिंक असूनही, मृत किंवा डुप्लीकेट मतदारांची नावे काढण्याची प्रक्रिया संथ आणि अपारदर्शक आहे.

**सुधारणा करण्याचे ठोस उपाय**

१. मतदार ओळखपत्र PAN कार्डशी लिंक करणे : PAN कार्ड तुलनेने सुरक्षित असून कर प्रणालीशी जोडलेले असल्यामुळे त्यातील डुप्लिकेशन कमी आहे.

२. १८ वर्षे पूर्ण होताच रिटर्न फाईल अनिवार्य करणे : त्यामुळे सर्व नवीन प्रौढ नागरिक सरकारी डेटाबेसमध्ये नोंदवले जातील आणि मतदार यादी आपोआप अपडेट होईल.

३. ऑनलाईन आणि रिमोट व्होटिंग : एखादा व्यक्ती आपल्या मतदारसंघाबाहेर असला तरी तो तेथूनच मतदान करू शकेल. यामुळे स्थलांतरित कामगार आणि विद्यार्थी देखील मतदान करू शकतील.

४. वार्षिक मतदार यादी ऑडिट : दरवर्षी स्वतंत्र यंत्रणेमार्फत मतदार यादीची पडताळणी.

५. डिजिटल बायोमेट्रिक व्हेरिफिकेशन : मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर बोटांचे ठसे किंवा चेहऱ्याची ओळख यांद्वारे मतदान, जेणेकरून डुप्लिकेट मतदान संपुष्टात येईल.

६. दंडात्मक तरतूद झ्र बनावट कागदपत्रे तयार करणारे, दुसऱ्याच्या नावाने मतदान करणारे किंवा मतदार यादीत चुकीची माहिती देणाऱ्यांवर कडक कारवाई.

**मतदानाचे प्रमाण वाढवण्याचे उपाय**

मतदानाच्या दिवशी सुट्टी आणि प्रवासाची सुविधा देणे.

ऑनलाईन मतदान किंवा पूर्वनियोजित मतदानाची सोय.

युवकांमध्ये जनजागृती मोहीम आणि सोशल मीडियावर मतदान चॅलेंज.

लोकशाही मजबूत करण्यासाठी केवळ आरोप-प्रत्यारोप पुरेसे नाहीत. मतदार यादी अचूक, सुरक्षित आणि पारदर्शक बनवणे ही देशाची प्राथमिकता असली पाहिजे. निवडणूक आयोगालाही हे समजून घ्यावे लागेल की त्याच्यावरचा विश्वास तेव्हाच टिकेल जेव्हा तो आपले सर्व निर्णय खुलेपणाने जनतेसमोर मांडेल.

जर ९९ टक्के नागरिक कोणत्याही अडथळ्याशिवाय मतदान करतील आणि प्रत्येक मत खरे असेल, तरच हे म्हणता येईल की भारताची लोकशाही केवळ जगातील सर्वात मोठी नाही, तर सर्वात मजबूत आहे.

## वाचक लिहितात

### आद्यकवी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज

मानवतेचे मूल्य समाजाला देणारे, ज्ञानीयांचा राजा ,वेदांचा ज्ञाता, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज हे तेराव्या शतकातील प्रसिद्ध आद्य कवी आणि संत होते. त्यांचा जन्म २२ ऑगस्ट १२७५ साली श्रावण कृष्ण अष्टमीला आपेगाव, पैठण येथे झाला. निवृत्तीनाथ हे संत ज्ञानेश्वर यांचे गुरु.

निवृत्तीनाथांना नवनाथांपैकी श्री गहिनीनाथ यांनी दीक्षा दिली होती. त्यामुळे ज्ञानेश्वर हे नाथ संप्रदायाच्या शिष्य परंपरेतील होते . तसेच त्यांनी वारकरी वैष्णव संप्रदायाची मुहूर्त मेढ रोवली. 'ज्ञाना रचिला पाया तुका केलासे कळस' हे सार्थ झाले .

ज्या वारकरी संप्रदायाचे आज आपण विराट स्वरुप बघतो आहोत. त्याचा पाया ज्ञानेश्वरांनी रचला आणि बाकी संतश्रेष्ठींसह तुकाराम महाराजांनी त्याला अत्युच्च शिखरावर नेले. त्यावेळेच्या सामाजिक व्यवस्थेचे कडे तोडत ज्ञानदेवांनी सर्वसामान्यांना साधा, सरळ भक्तिमार्ग दाखवला. त्याच भक्तीची पताका आजतागायत फडकत आहे. स्वतःच्या आचरणातून त्यांनी समाजाला कृतीप्रवण केले. संत ज्ञानेश्वर महाराजांना महाराष्ट्रात भक्ती भावाने माऊली म्हटल्या जाते.

ते सतत विठ्ठल भक्तीत लीन असायचे . त्यांनी संस्कृत भाषेतील भगवद्गीता प्राकृत मराठीत लिहून ज्ञानाचे दरवाजे सर्वसामान्यांसाठी खुले केले. तीच भावार्थदीपिका म्हणजे ज्ञानेश्वरी लिहिली. अमृतानुभव, चांगदेवपासष्टी, हरिपाठ, अभंग इत्यादी काव्य स्वरूपात लिहिले. त्यांनी ज्ञानेश्वरीत ९००० ओव्या लिहिल्या. स्वतःला प्रस्थापित करताना त्यांना अनेक दिव्यातून जावे लागले. परंतु त्याही परिस्थितीत स्थितप्रज्ञ राहून त्यांनी समाज उद्धाराचे कार्य केले. त्यांनी पसायदान लिहिले ते संपूर्ण जगाच्या कल्याणाकरताच.

जो जे वांछिल! तो ते लाहो! प्राणीजात!

हेच त्यांचे ध्येय होते. केवळ मनुष्यच नव्हे, तर प्राणी, पक्षी, झाडे सर्व सुखी आणि आनंदी असावे असेच त्यांचे ईश्वराकडे मागणे होते. असे हे संतश्रेष्ठ कवी आपल्या महाराष्ट्रात जन्माला आले यासारखे दुसरे भाग्य ते काय !त्यांनी स्वतः चा नाही तर कायम विश्वाचाच विचार केला.

साहित्य आणि काव्यरूपाने भक्तीचे भांडार त्यांनी समाजाला दिले. एवढा अमूल्य ठेवा समाजाला देऊन ते विरक्तच राहिले. हरिपाठ ज्यांनी म्हटला नसेल, किंवा ऐकला नसेल त्यांनी जरूर एकदा ऐकावा. इतके चैतन्य त्यात ओतप्रोत भरले आहे .

देवाचिये द्वारी उभा क्षणभरी! हरी मुखे म्हणा!
हरी मुखे म्हणा !पुण्याची गणना कोण करी!

हरी मुखे म्हणा याचा अर्थ अखंड नामस्मरण करण्याचा प्रयत्न करा, असे माऊलींनी सांगितले आहे. तीच कलियुगातील सर्वश्रेष्ठ साधना आहे. ज्ञानेश्वर माऊली आपल्या चरणी कोटी कोटी कृतज्ञता.

■ **सौ. माधवी पत्की, नागपूर**

### लक्ष विचलीत करण्यासाठीची नाटकं

राजकारणाचा स्तर कितीतरी खाली घसरला आहे, हे नव्याने सांगण्याची गरज नाही. विरोधक आणि सत्ताधारी नेत्यांनी एकमेकांवर टीका करताना बरीच खालची पातळी गाठली आहे . काही दिवसांपूर्वीच भाजपाच्या एका आमदाराने (माजी राज्यमंत्री) मी शिवसेनेचा बाप असल्याचे वक्तव्य केले. त्यावरून गदारोळ झाल्यानंतर त्यांनी माफी मागितली. महायुतीमध्ये सहभागी पक्ष तसेच विरोधी पक्षातीलही अनेक नेते बेताल वक्तव्य करीत सुटले आहे. मोठे नेते नंतर सांगतत, की आम्ही कान उपटले. परंतु, प्रत्यक्षात तसे नसावे. या मोठ्या नेत्यांकडून त्यांच्या चेल्या चपाट्यांना असे वक्तव्य करण्यास रान मोकळे करून दिले जात असले पाहिजे. राज्यात एक ना अनेक समस्या आहेत, त्या सोडविणे सरकारला शक्य नाही. या राज्यातील बेरोजगार आणि एकूणच समस्यांनी त्रस्त लोकांच्या संतापाचा उद्रेक होवू नये, लक्ष विचलीत व्हावे, म्हणून ही नाटकं चालली असावीत.

■ **राधेश्याम खंडाईत, नागपूर.**

# पाचव्या महिन्यात बाळाचा जन्म





आगळंवेगळं

अमेरिकेतील आयोवा राज्यात अवघ्या ५ महिन्यांच्या गर्भावस्थेत एका बाळाचा जन्म झाला. हे बाळ सध्या १ वर्षाचे आहे, पण आता त्याला जगातील सर्वात अकाली जन्मलेले बाळ म्हणून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सकडून प्रमाणपत्र मिळाले आहे.

डॉक्टरांनी सांगितले की जन्मावेळी बाळाचे वजन फक्त २८५ ग्रॅम होते, जे एका सफरचंदापेक्षा कमी आहे. जन्मानंतर लगेचच, बाळाला एनआयसीयू (नवजात शिशु अतिदक्षता विभाग) मध्ये नेण्यात आले, जिथे तीन डॉक्टरांच्या पथकाने त्याचे २४ तास निरीक्षण केले.

# त्वचेवरची ५ लक्षणे दर्शवतात... कोलेस्ट्रॉल वाढलं आहे





आजकाल, धावपळीच्या जीवनशैलीमुळे आणि अस्वस्थ खाण्याच्या सवयींमुळे अनेकांना आरोग्याच्या समस्या जाणवतात. एवढंच नाही तर अनेक आजारांची लक्षणेही दिसू लागतात. त्यातील एक आजार जो झपाट्याने वाढतोय आणि तो म्हणजे कोलेस्ट्रॉल. १० पैकी ६ ते ७ जणांमध्ये तरी कोलेस्ट्रॉलची समस्या दिसून येते.

कोलेस्ट्रॉल जेव्हा वाढतं तेव्हा शरीर आपल्याला काही संकेत देतं. जे ओळखणेही गरजेच असतात. शरीरात कोलेस्ट्रॉल वाढलं तर त्याचा परिणाम तुमच्या त्वचेवर देखील दिसून येतो. जर ही लक्षणे वेळेत ओळखली गेली नाहीत तर त्यामुळे गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात.

**डोळ्यांजवळ पिवळे डाग** : जर डोळ्यांभोवती किंवा पापण्यांवर लहान पिवळे डाग दिसले तर ते एक गंभीर लक्षण असू शकते. याला झेंथेलास्मा म्हणतात, जे तुमच्या रक्तातील कोलेस्टेरॉलची पातळी वाढल्याचे दर्शवते. हे डाग वेदनारहित असतात, परंतु कालांतराने वाढू शकतात आणि तुमच्या हृदयाच्या आरोग्याला धोका निर्माण करू शकतात

**हात आणि पायांवर मेणासारखे गाठी** : जर तुमच्या त्वचेवर लहान पिवळे किंवा मेणासारखे गाठी दिसू लागल्या तर ते उच्च कोलेस्ट्रॉलचे लक्षण असू शकते. याला झॅन्थोमा म्हणतात, जे शरीरात अतिरिक्त चरबी जमा झाल्यामुळे तयार होतात. या गाठी बहुतेकदा कोपर, गुडघे, हात आणि पायांवर दिसतात.

**त्वचेची जळजळ आणि खाज सुटणे** : जर तुम्हाला कोणत्याही विशिष्ट कारणाशिवाय त्वचेवर जळजळ, खाज सुटणे किंवा लालसरपणा जाणवत असेल, तर ते तुमच्या शरीरात वाढलेल्या वाईट कोलेस्ट्रॉलचे लक्षण असू शकते. उच्च कोलेस्ट्रॉलमुळे रक्तप्रवाहात अडथळा निर्माण होतो, ज्यामुळे त्वचेच्या पेशींपर्यंत पुरेसा ऑक्सिजन पोहोचत नाही आणि त्वचेला जळजळ होऊ लागते.

**थंड पाय आणि जखमा हळूहळू बरे होणे** : तुमचे पाय नेहमीच थंड वाटत असतील किंवा लहान जखमा बऱ्या होण्यास बराच वेळ लागत असेल तर हे उच्च कोलेस्ट्रॉल रक्ताभिसरणावर परिणाम करत असल्याचे लक्षण असू शकते.

**नखे व त्वचेचा रंग खराब होणे** : जर नखांचा रंग फिकट पिवळा किंवा निळा होऊ लागला असेल, तर हे देखील उच्च कोलेस्ट्रॉलचे लक्षण असू शकते. रक्ताभिसरण खराब झाल्यामुळे, नखे आणि त्वचेला पुरेसे पोषण मिळत नाही, ज्यामुळे ते कमकुवत आणि फिकट गुलाबी होऊ लागतात.

**यापासून स्वतःचे रक्षण कसे करावे?**

**निरोगी आहार** : तळलेले आणि तेलकट पदार्थ टाळा आणि फळे, भाज्या, काजू आणि फायबरयुक्त पदार्थ खा.

**नियमित व्यायाम** : शरीरातील कोलेस्टेरॉल नियंत्रणात ठेवण्यासाठी दररोज किमान 30 मिनिटे व्यायाम करा.

**धूम्रपान आणि मद्यपान टाळा** : या दोन्ही गोष्टी कोलेस्ट्रॉल वाढवतात आणि हृदयरोगांना आमंत्रण देतात.

**नियमित रक्त तपासणी करा** : तुमच्या कोलेस्टेरॉलची पातळी तपासत राहा, जेणेकरून वेळीच खबरदारी घेता येईल.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### राष्ट्रभक्तीचा महापूर

वारं पाहून उफणण्यात
आम्ही आहोत वाकबदार
बघा स्वातंत्र दिनीआमच्या
राष्ट्र भक्तिला कशी येते धार..

वर्षातून दोन वेळा
येते भौ भरती
बाकी मग वर्षभर
आहोटीच ओहोटी ..!

तिसरी शक्ति बनण्याचे
होण्या स्वप्न साकार
करावे लागेल राष्ट्रनिष्ठाने
भ्रष्टाचार मुक्त व्यवहार..!

## गडचिरोलीत नाट्यगीत स्पर्धा दोन सप्टेंबर रोजी

**गडचिरोली** : झाडीपट्टी कलावंत संस्था गडचिरोलीच्या वतीने सोमवार, ११ ऑगस्ट रोजी झालेल्या सभेनुसार बुधवार, २ सप्टेंबर रोजी विदर्भस्तरीय नाट्यगीत स्पर्धेचे आयोजन कात्रटवार कॉम्प्लेक्स गडचिरोली येथे करण्यात येणार आहे. गणपती उत्सवाच्या मंगलमय दिवसात कला रसिकांच्या मनोरंजनाकरिता नाट्यगीतांची मेजवानी मिळणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी झाडीपट्टीचे प्रसिद्ध ज्येष्ठ कलावंत प्रा. डॉ. शेखर डोंगरे, उद्घाटक सहकार महर्षी प्रकाश सावकार पोरेड्डीवार तर प्रमुख अतिथी समाजकल्याणचे सह आयुक्त सचिन मडावी, प्रा. राजेश कात्रटवार आदी उपस्थित राहणार आहेत. स्पर्धेनंतर लगेच निकाल घोषित करून बक्षीस वितरित केल्या जाईल. कार्यक्रमात गडचिरोली तालुक्यातील ज्येष्ठ कलावंताचा सत्कार करण्यात येणार आहे. जास्तीत जास्त स्पर्धेकांनी भाग घ्यावा. तसेच रसिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन झाडीपट्टी कलावंत संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र उपाध्याय, सिद्धार्थ गोवर्धन, राजू बोभाटे, दिलीप मेश्राम, भगवान गेडाम, सदा उईके, अरविंद गेडाम यांनी केले आहे.

# आदिवासींच्या हक्कासाठी युवकांनी लढा उभारावा

### आ. विजय वडेट्टीवारः देसाईगंज येथे आदिवासी दिन

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १२ :** आदिवासी समुदायाच्या मानवी अधिकाराचे संरक्षण, संस्कृतीचे रक्षण व त्यांचा जल, जंगल, जमिनीवरील अधिकार अबाधित राहावा, त्यांची ओळख, हक्क, सामाजिक ऐक्य, अस्तित्व, स्वाभिमान, आत्मसन्मान, अस्मिता, कायम राहावी, यासाठी व्यापक जनजागृती व प्रयत्नांची आवश्यकता लक्षात घेऊन सांस्कृतिक परंपरा जपण्यासाठी युवकांनी पुढे येऊन आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी लढण्याचा निर्धार करावा, असे प्रतिपादन काँग्रेसचे विधिमंडळ नेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी केले.

आदिवासी समाज संघटना तालुका देसाईगंज व आमदार रामद. ास मसराम तथा मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक मूलनिवासी (आदिवासी) दिवसानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी ते बोलले होते. या



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गडचिरोली चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव किरसान होते. प्रमुख अतिथी म्हणून आमदार रामदास मसराम, जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राम्हणवाडे, माजी नगराध्यक्ष शाम उईके, शशिकांत मडावी, कुरखेडा तालुकाध्यक्ष जीवन पाटील नाट, आरमोरी तालुकाध्यक्ष मिलिंद खोब्रागडे, परासराम टिकले, नितीन राऊत, जेसा मोटवानी, नंदू नरोटे, दिलीप घोडाम, भूषण अलामे, गोपाल उईके, किशोर कुंभरे, विलास सायाम, विजय उईके, विजय बनसोड, घनश्याम पंधरे, भीमराव नगराडे, उमेश उईके, प्रशांत मडावी, विलास शयाम, डॉ. विजय उईके, मडावी, विजय बनसोड, भीमराव नगराळे, प्रशांत किलनाके, बंडू सिडाम, अनिल उईके, मिलिंद उईके, अमित केराम, सागर उईके आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी खासदार डॉ. किरसान म्हणाले, आदिवासी समाजाची परंपरा, संस्कृती व भाषा ही आपली खरी ओळख आहे. जागतिक मूलनिवासी दिन हा फक्त उत्सव नाही तर आपल्या अस्तित्वाच्या लढयाचा आणि सांस्कृतिक वारशाच्या संवर्धनाचा दिवस असल्याचे त्यांनी सांगितले. तर आमदार रामदास मसराम म्हणाले, जंगलात राहणारा समाज म्हणजे आदिवासी समाज अशी एकेकाळी आदिवासी समाजाची ओळख होती. मात्र, आता आदिवसींनीही आपली वाट बदलून मुख्य प्रवाहाची वाट धरली आहे. या समाजातून शिक्षित व स्पर्धा परीक्षांमध्ये नैपुण्य दाखविणाऱ्यांचा टक्कादेखील वाढला आहे. वर्तमानातून उज्ज्वल भविष्याकडे व समाजाच्या मुख्य प्रवाहात जाताना आपल्या गौरवशाली परंपरांचे जतन करणारा आदिवासी समाज आहे. त्यामुळे भविष्यातही अशीच परंपरा कायम राहण्यासाठी शासन दरबारी प्रयत्न केले जाईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी पारंपरिक कलेचा जागर गोंडवाना संस्कृतीचे महत्व अधोरेखित करण्यासाठी तुकूमवार्ड, देसाईगंज येथून गोटूल भूमीपर्यंत ढोल-नगाऱ्यांच्या गजरात, पारंपरिक वेशभूषा व गोंडी लोकगीतांच्या तालावर सजलेली रॅली काढण्यात आली होती. त्यानंतर गुणवंत विद्यार्थ्यांचा व ज्येष्ठांचा सत्कार करण्यात आला. याचबरोबर गोंडी नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आली. पारंपरिक वेशभूषा, नृत्याची लयबद्धता व सादरीकरण यांवर परीक्षकांनी विजेते ठरविले. यात प्रथम क्रमांक शिरपूर, द्वितीय क्रमांक खेडेगाव (कुरखेडा), तृतीय क्रमांक ईळादा या पथकांनी पटकावला. विजेत्या पथकांना आमदार रामदास मसराम यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

## किटाळीत ग्रा.पं. पदाधिकाऱ्यांना प्रशिक्षण

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १२ :** पेयजल समृद्ध गाव विषय अनुषंगाने आरमोरी तालुक्यातील किटाळी ग्रामपंचायत सभागृहामध्ये गाव पातळीवरील पाणीपुरवठा समिती व नेतृत्वातील विविध पदा. धिकारी यांच्यासाठी विशेष प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रशिक्षणाचा उद्देश गाव विकास प्रक्रियेत पाणीपुरवठा समितीची भूमिका ठळकपणे अधिरेखित करणे तसेच सदस्यांना त्यांच्या जबाबदारीच्या विषयी योग्य मार्गदर्शन करणे हा होता. प्रशिक्षणाचा गाभा म्हणजे 'बॉस कोर्स' होय. यामध्ये शासन आद. ेश, पेयजल योजना, यंत्रणा व कर्मचारी, शासनाची निधी संदर्भात माहिती देण्यात आली. प्रशिक्षणाची सुरुवात झाल्यानंतर तंज्ञाच्या उपस्थित हवामान व वातावरणात होणारे बदल दुष्काळाची कारणे, स्वच्छ पाणी समस्या व उपाय योजना जलसंधारणाच्या शाश्वत



पद्धती तसेच जलजीवन मिशन व श्जल स्वराज्यश अभियान आदी शासकीय योजनांची अंमलबजावणी यावर सखोल अंमलबजावणी यावर सखोल चर्चा झाली.

गावासाठी आवश्यक असलेल्या 'जल अंदाजपत्रक' तयार उदाहरणासह माहिती देण्यात आली संवादात्मक उपक्रम चर्चासत्र, गाणी, कविता, कथा, घोषणा संकल्पना अधिक स्पष्ट झाली. प्रशिक्षण कार्यक्रमजिल्हा समन्वयक अर्चना जनगणवार तसेच राज्य निमंत्रक मालती सगणे यांच्या मार्गदर्शनाखाली पारपडला. त्यांनी आपल्या सहज व सुस्पष्ट शैलीत प्रशिक्षणार्थींना समर्पक मार्गदर्शन केले. यावेळी सरपंच राजेश लिंगायत, ग्रामपंचायत सदस्या शिल्पा मेश्राम, यामिना लोहट, बिझनेस वूमन संध्या लांडगे, वन समिती अध्यक्ष वामन झरली, ग्रामपंचायत अधिकारी टिकले, अंगणवाडी सेविका, पाणीपुरवठा समिती सदस्य, आशा, पर्यावरण सखी, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविक अर्चना जनगणवार यांनी केले. तर आभार आरती सोनटक्के यांनी मानले. उपक्रमाचे आयोजन रिसोर्स अँड सपोर्ट सेंटर फॉर डेव्हलपमेंट मुंबई, असर इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

## मादक द्रव्य नियंत्रण समितीतर्फे अवैध दारूविक्री बंद करा

### आदिवासी दिन कार्यक्रमातून हजारो नागरिकांचे आवाहन

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १२ :** धानोरा तालुक्यातील पेंढरी येथे पेंढरी, दुधामाळा, झाडापापडा, खुटगाव, रांगी आदिवासी इलाका समितीच्या वतीने ९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला. यावेळी मुक्तिपथ धानोरा चमू कार्यक्रमाला उपस्थित होती. अवैध दारूविक्री थांबविण्यासाठी ग्रामस्थांनी एक होऊन आपल्या गावात मादक द्रव्य नियंत्रण समिती स्थापना करण्याचे उपस्थित हजारो आदिवासी समाजबा. धवांना यावेळी आवाहन यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मैनुजी जांगधुर्वे होते. उपाध्यक्ष झाडापापडाचे जमीदार दयाराम पवार, प्रमुख अतिथी म्हणून इलाखा माजी गुरु पाटील तसेच मार्गदर्शक म्हणून पावसू पावे, कोंडावाही ग्रामसभा अध्यक्ष देवाजी पदा, भरत



येरमे, अरुण शेडमाके, माजी जिप उपाध्यक्ष मनोहर पोरेटी, पेंढरी शाळेचे मुख्याध्यापक सोमणकर यांच्यासह पेंढरी, दुधामाला, झाडापापडा, खुटगाव, रांगी इलाका, प्रत्येक गावातील गाव पाटील, जमीनदार, समितीचे पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमात ग्रामसभा-संविधानिक हक्क, स्वतंत्र ग्रामसभा, स्वशासन सरकार, १५ ऑगस्टला पेसा अंतर्गत येणारे १७ विषय पारित करणे, मादक द्रव्य समिती प्रत्येक गावात तयार करणे आदी मुद्द्यांवर मार्गदर्शन करण्यात आले. मुक्तिपथ चमूने गावातील अवैध दारूविक्री थांबविण्यासाठी व्यसन उपचार शिबीर, गावागावात ग्रामस्तरावर दारूबंदीचे ठराव पारित करणे. शक्तीपथ संघटन महिलांच्या माध्यमातून कृती करणे या कृतीमध्ये इतरांचा सहभाग असणे गरजेचे आहे याविषयी चर्चा केली. तसेच १५ ऑगस्टच्या ग्रामसभेत गावागावात मादकद्रव्य नियंत्रण समिती गठीत करण्याचे आवाहन केले.

## रस्त्यावरील खड्डयांना दोषी कोण?

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १२ :** जिल्ह्यातील अनेक रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. यामुळे सर्वच स्तरावरून नागरिकांची ओरड होत आहे. शहरातून आरमोरीकडे जाणाऱ्या रस्त्याची डागडुजी काही दिवसांपूर्वी करण्यात आली होती. मात्र, अल्पावधीतच या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असून प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. दलदलीच्या ठिकाणी खड्डे पडत असल्याचे सांगण्यात येत असले तरी यासाठी नेमका दोष कुणाचा? असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. खड्डे बुजविल्यानंतरही वारंवार खड्डे पडत असल्याने सामान्य नागरिकांकडून आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

## मंत्र्याविरोधात शिवसेनेने केले जनआक्रोश आंदोलन

### मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्याची मागणी

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १२ :** पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने राज्यातील युती सरकारच्या भ्रष्टाचारी मंत्र्यांची हकालपट्टी झालीच पाहिजे, या मागणीसाठी महाराष्ट्रात सोमवारी (दि. ११) दुपारी १२ वाजता जनआक्रोश आंदोलन प्रत्येक जिल्ह्यात करण्यात आले. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने गडचिरोली जिल्ह्याचे जिल्हाप्रमुख वासुदेव शेडमाके यांच्या नेतृत्वात शिवसेना कार्यालय चामोर्शी रोड गडचिरोली येथून रॅली काढून 'जय भवानी जय शिवाजी'च्या घोषणा देत स्थानिक इंदिरा गांधी चौकात युती सरकारच्या विरोधात भ्रष्टाचारी मंत्र्यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्याची जोरदार मागणी करण्यात आली.

यावेळी सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात



आली. 'उद्धव साहेब आगे बढो हम तुम्हारे साथ है', 'भ्रष्टाचारी मंत्र्यांची हकालपट्टी करा', अशी जोरदार घोषणा देत इंदिरा गांधी चौकातील परिसर दणाणून गेला. याप्रसंगी सहसंपर्कप्रमुख विजय शृंगारपवार, जिल्हा सल्लागार प्रा. राजेंद्र लांजेकर, विधानसभा संघटक नंदू कुमरे, तालुकाप्रमुख कुणाल कोवे, मुलचेरा तालुकाप्रमुख समीर मुखर्जी, तालुकाप्रमुख प्रफुल येरने, दादू रामगिरवार, तालुक. ाप्रमुख मनोज पोरटे, शहर प्रमुख पप्पू शेख, माजी जिप सदस्य लक्ष्मी मने, मंगला बीरमवार, भारती मडावी, माजी जिल्हा संघटिका हेमलता वाघाडे, चंदना बिष्णुई, तुळजा तलांडी, अश्विनी चौधरी, युवा सेना जिल्हा अधिकारी पवन गेडाम, चेतन उरकुडे, प्रशिक झाडे, वैभव सातपुते, गणेश धोटे, बादल मडावी, भूषण पोरटे, अमित नंदा, सोहेल शेख, अतुल नैताम, नितीन निंबोडकर, संतोष जेंगटे, कृष्णा पदा, शुलख कावळे व अनेक शिवसैनिक कार्यकर्ते उपस्थित होते.

## मुनघाटे महाविद्यालयात रंगनाथन जयंती साजरी



**प्रतिनिधी**
**कुरखेडा दि. १२ :** दंडकारण्य शैक्षणिक व सांस्कृतिक विकास संशोधन संस्था गडचिरोली द्वारा संचालित स्थानिक श्री गो. विंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालयात महाविद्यालयाच्या ग्रंथालयशास्त्र विभागाद्वारे प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांच्या मार्गदर्शनात उपप्राचार्य पी. एस. खोपे यांच्या प्रमुख उपस्थित ग्रंथालय शास्त्राचे जनक रंगनाथन यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## देवतळे महाविद्यालयात क्रांती दिन व जागतिक आदिवासी दिन साजरा

**तालुका प्रतिनिधी**
**चामोर्शी दि. १२ :** स्थानिक कर्मवीर दादासाहेब देवतळे महाविद्यालयात प्राचार्य डॉ. डी.जी. म्हशाखेत्री यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभाग व रासेयो यांच्या संयुक्त विद्यमाने ऑगस्ट क्रांती दिन व जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला.



याप्रसंगी ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. डॉ. भूषण आंबेकर यांनी जननायक बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण व दीपप्रज्वल्लन करून अभिवादन केले व मार्गदर्शन करतांना स्वातंत्र्य लढ्यातील चले जाव आंदोलन व स्वातंत्र्य लढ्यातील महापुरुषांचे योगदान याविषयी माहिती दिली. प्रा. अरुण कोडापे यांनी जागतिक आदिवासी दिनाचे महत्व अधोरेखित केले. यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. दीपक बाबनवाडे, प्रा. डॉ. राजेंद्र झाडे, प्रा.रोशन गेडाम, प्रा.वंदना थुटे, प्रा. मीनल गाजलवार, प्रा. प्रमोद चापले, प्रा. डिंपल माळवे, प्रा. शुभांगी खोबे, प्रा. सन्यासी मंडल, लोमेश दरडे, सचिन भरडे, रवी कऱ्हाडे, आनंद. राव दिवटे, चंद्रपाल राठोड, विक्की बारसागडे, निलेश कुनघाडकर तथा महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.

## आदिवासींना धर्म नाही, संस्कृती आहेः कुसुम अलाम

**तालुका प्रतिनिधी**
**कोरची दि. १२ :** खोऱ्याकपारीत राहणाऱ्या आदिवासींना कोणताही धर्म नाही. आदिवासी समाजाला संस्कृती आहे. पारंपरिक वेषभूषा, रितीरिवाज, सण, उत्सव साजरे करण्याच्या पद्धती ईतर धर्मापासून वेगळे आहे, असे प्रतिपादन विख्यात कवयत्री कुसुम आलाम यांनी केले.

कोरची येथील गोटूल भूमीवर ग्रामसभा खुणारा, आदिवासी गोंड समाज कोरची, आदिवासी कवर समाज संघटन क्षेत्र कोरची, आदिवासी हलबी समाज बेडगाव, आदिवासी गोंड, गोवारी समाज कोरची, आदिवासी धुर्व गोंड समाज कोरची, एआय ए ईएफ कोरची, आदिवासी विद्यार्थी संघटना कोरची यांचे संयुक्त विद्यमाने विश्व आदिवासी दिवस कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी



मार्गदर्शन करतांना त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाचे अध्यक्ष जगदीश कपुरडेहेरिया होते. प्रमुख अतिथी म्हणुन उपाध्यक्ष रामसुराम काटेंगे, उद्घाटक राजीमसाय कल्लो, सह उद्घाटक तुलाराम पोरेटी, शामसाय केरामी होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. अनिल होळी, गोंदिया जिल्ह्यातील कार्याध्यक्ष चेतनदादा उईके, प्रा. मेघराज कपूर उपस्थित होते.

कुसुम आलाम पुढे म्हणाल्या, जेव्हा दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील देशात जिवीत व वित्त हानी झाली, तेव्हा हे युध्द कुणालाही नकोसे झाले. तेव्हा बरेच देश एकत्र येऊन यानंतर जगात युध्द झाले नाही पाहिजे, जगात शांतता राहीली पाहिजे असे ठरविण्यात आले. त्याच वेळी जगातील मूल निवासी यांचेवर मोठ्या प्रमाणात अन्याय अत्याचार होत होता, त्यासाठी याच जागतिक स्तरावरील संघटनेने ठराव पारित करून जगातील कोणत्याही मुळनिवासींवर अन्याय होणार नाही असे ठरविले. तोच दिवस होता ९ ऑगष्ट. आपल्या देशात ९ ऑगष्ट हा दिवस आदिवासी दिवस म्हणून साजरा करण्यासाठी तत्कालीन आदिवासी विकास मंत्री मधुकरराव पिचड यांनी आदेश दिले होते. त्या आदेशानुसार मागील वर्षी पर्यंत ९ ऑगष्ट हा जागतिक आदिवासी दिवस म्हणून साजरा करण्यात आला. तशा शासनाकडून सर्व विभागाला कळविण्यात येत होते. परंतु यावेळी शासनाकडून अशाप्रकारच्या कोणत्याही सुचना आल्या नाही यावर कुसुम आलाम यांनी नाराजी व्यक्त केली. यावेळी डॉ. मेघराज कपूर, चेतनदादा उईके, प्रा. अनिल होळी, यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान लहान मुलांचे सांस्कृ तिक कार्यक्रम लोकांचे लक्ष वेधून घेत होते. १० वी, १२ वी मध्ये ७५ टक्के पेक्षा जास्त गुण घेऊन उत्तीर्ण झालेल्या आणि जेईई परिक्षेत पास झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

## मुरलीधर महाराजांचा अवतरण दिव विविध उपक्रमाने साजरा



**तालुका प्रतिनिधी**
**चामोर्शी दि. १२ :** वैनगंगा नदीच्या काठावर हरणघाट येथील श्री मुरलीधर धाम कार्तिक स्वामी हनुमान मंदिर देवस्थान समितीद्वारा संत मुरलीधर महाराज यांचा अवतरण दिवस सोहळा शनिवारी (दि.९) हरणघाट येथील मुरलीधर धाम मंदि. रात विविध सामाजिक व राजकीय मान्यवर तसेच हजारो भक्तगणांच्या उपस्थितीत धार्मिक परंपरा जोपासत भक्तिमय वातावरणात रक्षाबंधन व वृक्ष लागवड या विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला.

दरवर्षीप्रमाणे यावर्षी हरणघाट येथील संत मुरलीधर देवस्थान समितीद्वारा शनिवारी आयोजित संत मुरलीधर महाराजांच्या अवतरण कार्यक्रमासाठी हरणघाट येथील संत मुरलीधर महाराज यांनी दरवर्षीच्या परंपरेने यावर्षी सावली तालुक्यातील देवटोक येथील शिवमंदिरात पूजाअर्चना, आरती केली. त्यानंतर थेट चपराळा येथे श्री हनुमान मंदिर प्रशांतधाम येथे त्यांचे गुरू ब्रह्मलीन कार्तिक स्वामी महाराजांच्या प्रतिमेला राखी अर्पण करत दर्शन घेतले. त्यानंतर सगणापूर येथील कालिदास आभारे या गरीब भक्ताच्या निवासस्थानी जात तेथे आपला अवतरण दिवस साजरा केला. तेथून हरणघाट येथील मुरलीधर धाम मंदि. रात येताच ढोल ताशाच्या गजरात त्यांचे स्वागत करून मंदिरात आल्यावर पूजाअर्चना, आरती करण्यात आली. आईबाबांनी अभिषेक, पूजाविधी पार पाडला. त्यानंतर वडील विठ्ठलराव गुज्जनवार व आई नंदा गुज्जनवार यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करत आशीर्वाद घेतले. उपस्थित अनेक मान्यवरांनी बाबांना राखी व वृक्ष देत सत्कार केला. तसेच समितीचे सदस्य मारोती उमलवार, सुशील शिवकुमार, रवींद्र पाल, राजू डांगेवार, राजू चंदने, उमेश पिटाले, सुनील आभारे, लक्छायाजी नागुलवार, सुनील बोमनवार, अतुल भिरकुंडवार यांच्यासह आदींनी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ सत्कार केला.

जी या देवस्थानची महती आहे, ती अबाधित ठेवण्यासाठी मला काहीही नको. फक्त देवस्थानातील धार्मिक भावना वाढीला नेण्यासाठी सहकार्याची भावना ठेवा. आपल्या मुलांना चांगले सामाजिक, धार्मिक संस्कार देत त्यांना घडवा. आपल्या मुलाचा अवतरण दिवस पहिल्या वर्षापासून आपल्या शक्तीप्रमाणे करून पुढील वाटचालीची प्रेरणा द्या. आज मी माझ्या सगणापुरातील कालिदास या गरीब भक्ताच्या घरी जाऊन माझा अवतरण दिवस साजरा केला. त्यामुळे मी धन्य झालो.

**-संत मुरलीधर महाराज, हरणघाट**

# समाजाने पंचसुत्री स्विकारल्यास आर्थिक विकास साध्य होणार

### भाजप प्रदेश उपाध्यक्ष माजी आ. डॉ. देवरावजी होळी यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १२ :** पंचसूत्र कुटुंब प्रबोधन, पर्यावरण, सामाजिक समरसता, नागरी कर्तव्य व स्वरू जागृती ही पंचसूत्री आदिवासी समाज बांधवानी अंगीकार केल्यास समाज बदलायला वेळ लागणार नाही. या पंचसूत्रीचा आपल्या जीवनशैलीमध्ये, चालीरीतींमध्ये रूढी परंपरांमध्ये अंगीकार करणे म्हणजेच पंच परिवर्तन होय. सोबतच आपण अधिक ताकतीने लोकसहभागाने आपल्या समा. जामध्ये ती रूजविण्यासाठी प्रयत्न करणे. समाजात ही पंचसूत्री राबविल्यास सामाजिक व मानसिक बदल घडवून आणण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. समाजाचा



सर्वांगीण विकास करण्यासाठी, आत्मनिर्भर समाज निर्माण करण्यासाठी व देशाला सर्वोच्च स्थानावर नेण्याचे ध्येय ठेवून आपण हे काम केले पाहिजे. त्याकरिता या पंचपरिवर्तनाच्या माध्यमातून आपल्या समाजाला गतवैभववाकडे घेऊन जाता यावे याकरिता अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद नवी दिल्ली, शाखा गडचिरोली माध्यमातून आपण ही पंच परिवर्तनाची सूत्रे समाजामध्ये रुजवण्यासाठी पुढाकार घेत आहे. ती संपूर्ण समाजामध्ये रुजविता यावे यासाठी आपण प्रयत्न करणार आहे. त्याचा स्वीकार करून समाज जेव्हा त्याप्रमाणे जगू लागेल त्याची अनुभूती घेऊ लागेल तर आपल्या समाजाचा शाश्वत विकास शक्य आहे, असे प्रतिपादन भाजप प्रदेश उपाध्यक्ष माजी आ. डॉ. देवरावजी होळी यांनी केले.

गोंडवाना समाज सुधारक मंडळ फुटाना/ चिचगडच्या सौजन्याने जागतिक आदिवासी दिवस उत्साहात संपन्न झाला. यावेळी ते उद्घाटक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार संजय पुराम, माजी सभापती सविता पुराम यांच्या हस्ते चिचगड येथील ४५ लक्ष विविध विकास कामाचे लोकार्पण करण्यात आले.

८ ऑगस्ट आदिवासी दिवस व क्रांती दिनाचे औचित्य साधून ह्या पंच परिवर्तनाची माहिती आपल्या समाजातील शेवटच्या घटकापर्यंत देता यावी समाजामध्ये ती रुजविता यावी यासाठी आपण समाजातील तत्त्वज्ञ, लेखक, विच. ारवंत, इतिहासकार, विद्वान, जागृत समाज घटकांनी यांनी यामागे भक्कमपणे, ताकतीने उभे रहावे असे सांगीतले.

यावेळी प्रामुख्याने उमेश काशीद प्रकल्प अधिकारी, कविता गायकवाड उपविभागीय अधिकारी देवरी, अनिल बिसेन सभापती प. स. देवरी, संजू उईके नगराध्यक्ष देवरी, मारोतराव इचोडकर माजी उपसभापती प. स. गडचिरोली, राजकुमार पुराम, रमेश ताराम, अंबिकाताई बंजार, टिकेश बोपचे तसेच आदी मान्यवर उपस्थित होते.







# अवयवदान : एक सामाजिक कार्य

अवयवदानाला चालना मिळावी याकरीता राज्यस्तरावर कार्यक्रम हाती घेऊन जनजागृतीसाठी कार्य केले जाते. सध्या राज्यभरात ३ ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत अवयवदान पंधरवड्याचे आयोजन प्रभावी व उद्दिष्टपूर्ण रितीने करण्यात येत आहे. तसेच दरवर्षी १३ ऑगस्ट रोजी जागतिक अवयवदान दिन साजरा केला जातो. मृत्यूनंतर कुणाचे तरी जीवन फुलवूया! असा जर विचार मनात आणला तर समाजातील हजारो नागरिक या अवयवदान अभियानात स्वतःहून सहभागी होतील, अवयवदानाचा अर्ज भरतील. याचाच एक भाग म्हणून अवयवदानाचे महत्व स्पष्ट करण्याचा प्रयत्न या लेखातून करण्यात येत आहे.

-------------

अवयवदान प्रत्यारोपणाबाबत नागरिकांमध्ये मोठी उत्सुकता आहे. एखाद्या चांगल्या व्यक्तीने जवळच्या नातेवाईकांस किडनी, यकृत दिले तर त्याच्या शरीरावर काही परिणाम होईल का? अवयव पुन्हा निर्माण होऊ शकतो का? असे काही प्रश्न आहेत.

खरे तर वैद्यकीय शास्त्राने मोठी प्रगती केली असून प्रत्यारोपण प्रक्रिया अतिशय काळजीपूर्वक केली जाते. किडनी, हृदय, फुफ्फुस, यकृत, डोळे आदी अवयवांचे यशस्वीपणे प्रत्यारोपण झाल्याचे आपण माध्यमातून वाचतो. त्यामुळे नागरिकांनी कोणतीही भीती बाळगण्याचे कारण नाही.

रुग्ण दवाखान्यात भरती झाला म्हणजे त्याचे अवयव काढून घेणे, अनाथ मुले, व्यक्ती, भिकारी यांना पकडून अवयव काढून घेणे, पैशाचे आमिष दाखवून अवयव काढणे अशा प्रकारच्या घटनांमध्ये काही डॉक्टर्स व अवयवांची तस्करी करणारी माणसे सहभागी होती. त्यामुळे माणसे अपंग व्हायची, मृत्यूमुखी पडायची.

अशा अवयव प्रत्यारोपणामध्ये गरजूंना फायदा व्हावा, त्या प्रक्रियेतील धोका कमी होऊन सुरक्षित प्रत्यारोपण होण्यासाठी मानवी उपचाराकरिता व अवयवांची व्यावसायिक विक्री थांबावी म्हणून केंद्र सरकारने मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा - १९९४ लागू केला. मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा १९९४ मध्ये अंमलात आल्यानंतर प्रत्यारोपणाच्या संख्येत वरचेवर वाढ होत गेली.

रिपोर्टनूसार २०२४ या एका वर्षामध्ये १३४७६ किडनी, ४९०१ लिव्हर, २५३ हृदय, २२८ फुफ्फुसांचे आणि ४४ स्वादुपिंडांचे प्रत्यारोपण करून रुग्णांना नवे जीवन देण्यात आले आहे. आताच्या स्थितीत संपूर्ण देशामध्ये लाखो मुत्रपिंड, यकृत व हृदय विकारांनी ग्रस्त रुग्ण असून ते अवयव दात्याच्या प्रतिक्षेत आहेत. प्रत्यक्षात ही आकडेवारी अधिक असून त्यात रोज वाढच होत आहे.

या प्रत्यारोपण कायद्यानुसार कोणत्याही नोंदणीकृत संबंधित डॉक्टरला कुठल्याही व्यक्तीचे अवयव काढणे, प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यापूर्वी त्याचे परिणाम, धोके याची माहिती रुग्णास व त्याच्या नातेवाईकास दिली पाहिजे.

या कायद्यांतर्गत नोंदणी केलेल्या रुग्णालयातच शस्त्रक्रिया केल्या जाऊ शकतात. त्याचबरोबर पीडित रुग्णासाठी अवयव देणारी व घेणारी व्यक्ती जवळचे नातेवाईक असणे गरजेचे असते.

जर असे नातेवाईक नसतील तर प्रत्यारोपण समितीची परवानगी घेणे आवश्यक असते. या समितीतील सदस्यांकडून सखोल तपासणी केल्यानंतरच प्रत्यारोपणाचा मार्ग मोकळा होतो. त्याचबरोबर ज्या रुग्णावर प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करायची व तो जेथे दाखल आहे त्या रुग्णालयाच्या डॉक्टरांनी प्रत्यारोपण प्राधिकरण समितीला संपूर्ण माहिती देणे बंधनकारक आहे.

तसेच संपूर्ण राज्यातील अवयवदान समन्वय करण्यासाठी मुंबई येथे झोनल ट्रान्सप्लांट कॉ- ऑर्डिनेशन सेंटर उभे करण्यात आले आहे. या सेंटरच्या छत्रपती संभाजीनगर, पुणे, नागपूर येथे शाखा सुरू करण्यात आल्या असून अवयवदान प्रक्रियेत सुसूत्रता आणण्याचे काम केले जाते.

मोठ्या शहरातील कोणत्या रुग्णालयात किती गरजू रुग्णांना अवयवाची गरज आहे. दाते कोण आहेत, याची संपूर्ण माहिती या शाखांमध्ये उपलब्ध आहे. प्रत्येक अवयवाच्या प्रत्यारोपणासाठी काही नियम केलेले आहेत.

अनिल आलुरकर
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती
कार्यालय, अमरावती.

उदा. किडनी अवयवदाना बाबत नियम आहे की, किडनी दात्याला महिनाभर डायलिसिसवर ठेवावे लागते. पती-पत्नी किंवा रक्ताचे नातेवाईक एकमेकांना किडनी देऊ शकतात. तसेच किडनी दात्याला हा अवयव किती महत्त्वाचा आहे व तो काढल्याने शरीरावर काय काय परिणाम होतात याची संपूर्ण लेखी माहिती द्यावी लागते.

प्रत्यारोपण करण्यापूर्वी रुग्ण व अवयवदाता यांचे ओळखपत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड, शिधावाटप पत्रिका आदी कागदपत्रे तपासली जातात. तसेच रक्ताचे नाते ओळखण्यासाठी जन्माचा दाखला, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, रेशनकार्ड आदी पुराव्याची शहानिशा करावी लागते.

ज्या रुग्णालयात शस्त्रक्रिया होणार आहे तेथील समन्वयक ही सर्व कागदपत्रे तपासतो. त्यानंतर प्रत्यारोपण प्राधिकरण समितीपुढे सादर करतो व त्यानंतरच प्रत्यारोपणाची परवानगी मिळते. अवयवदान प्रत्यारोपण प्रक्रिया अतिशय पारदर्शी ठेवावी असा नियम आहे. उदा. प्रत्यारोपण प्राधिकरण समितीकडे विविध रुग्णांची यादी असते. किती रुग्णांना कोणत्या अवयवांची गरज आहे हे नमूद असते. त्यासाठी प्रतिक्षा यादीतीलच रुग्णांना अवयवदान केले जाते.

या प्रत्यारोपण कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या डॉक्टर्स आणि त्या रुग्णालयाला लाखो रुपयांचा दंड आकारल्या जाऊ शकतो. तसेच गुन्हा सिद्ध झाल्यास डॉक्टरांनाही तुरुंगाची हवा खावी लागते.

सध्या मुंबई शहरात जवळपास ३५ रुग्णालयांनी अवयवदान प्रत्यारोपणासाठी नोंदणी केली आहे. त्यात महानगरपालिका, सरकारी रुग्णालये, तसेच काही खाजगी रुग्णालयांचा समावेश आहे.

जगामध्ये स्पेन हा देश अवयवदानात पहिल्या क्रमांकावर असून इंग्लंड, अमेरिका, हाँगकाँग, जपान आदी देशात एक लाख मृत्यूच्या मागे ५० जण अवयवदान करतात. त्या प्रमाणात भारतात हे प्रमाण खूपच कमी आहे. नॅशनल हेल्थ पोर्टलच्या मते स्पेनमध्ये ३५ टक्के तर अमेरिकेत २६ टक्के आणि त्याच्या तुलनेत आपल्या देशात प्रती दशलक्ष लोकसंख्येमागे केवळ ०.६५ टक्के अवयवदान केले जाते.

अलिकडच्या काळात वैद्यकीय क्षेत्रात झपाट्याने बदल होत असून रुग्णांना चांगल्या सोयी सुविधा मिळत आहेत. समाजामध्ये देखील नवनवीन अत्याधुनिक शस्त्रक्रिया, नवे उपचार याबाबत उत्सुकता असते. कुठल्याही आजारावर मात करण्याची किमया वैद्यकीय क्षेत्राने केली आहे.

आजार कितीही गंभीर असो, नवे संशोधन, नव्या उपचार पद्धतीमुळे तो बरा होण्याची शक्यता ९५ टक्क्यापर्यंत गेली आहे. वैद्यकीय शास्त्राचे हे मोठे यश म्हणावे लागेल. पूर्वी रक्तदान, नेत्रदान करण्यास सहजासहजी कुणी व्यक्ती पुढे येत नव्हती. आता एवढी जनजागृती झाली की अनेक ठिकाणी रक्तदान शिबीरे होताना दिसतात. नेत्रदानासाठीही लोकांचा सहभाग वाढलेला आहे.

तशाच प्रकारे जगभर अवयव दानाचे महत्त्व वाढताना दिसत आहे. काहीजण देहदान करून समाजासमोर एक चांगला आदर्श ठेवताना पाहतो. अवयवदान म्हणजे जेव्हा एखादी व्यक्ती मृत्यू पावते, किंवा ज्या व्यक्तींचा मेंदू डेड होतो. तेव्हा त्या व्यक्तीच्या शरीरातील किडनी, हृदय, यकृत, डोळे, फुफुसे, स्वादुपिंड व त्वचा हे अवयव देणे होय.

एखादी आजारी व्यक्ती आपल्या नातेवाईकांना सांगून ठेवते की, माज्या मृत्यूनंतर माझे शरीर दवाखान्यात द्या, देहदान करा किंवा शरीरातील किडनी, यकृत, डोळे, त्वचा गरजू रुग्णांना द्या. तेव्हा गरजू रुग्णांवर डॉक्टर्स या अवयवाचे यशस्वीपणे प्रत्यारोपण करतात. त्यामुळे कुणाला किडनी मिळते तर कुणाला डोळे! किडनी, लिव्हरमुळे जीवनदान मिळते. मरणाच्या अवस्थेत असलेली माणसे पुन्हा चांगले आयुष्य जगू शकतात. हे मोठे सामाजिक कार्य म्हणावे लागेल.

धडधाकट माणसे अपघातात मृत्यू पावतात. कुणाला हृदयविकाराचा झटका येऊन मृत्यू होतो. कुणाला स्मृतीभ्रंश होतो, अशावेळी त्यांच्या शरीरातील अवयव गरजूंना देणे याच्याशिवाय मोठे कार्य नाही. माणसे मरतात तेव्हा आपण एकतर त्यांना जमिनीत पुरतो नाहीतर जाळतो. तेव्हा शरीरातील चांगले अवयव नष्ट होतात. त्यापेक्षा त्यांच्या अवयवदानामुळे गरजू रुग्ण जर मरणाच्या दारातून परत येणार असेल व तो पुढे चांगले आयुष्य जगणार असेल तर अवयवदानासारखे महान कार्य नाही.

सध्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मानवी अवयव प्रत्यारोपणाद्वारे विविध गंभीर आजारावर उपचार होतात. अवयवदानाद्वारे (लाईव्ह ऑर्गन डोनेशनद्वारे) किडनी, लिव्हर, प्रत्यारोपण करण्यात येते. नॅशनल हेल्थ पोर्टल नूसार भारतात दरवर्षी ५ लाख लोक अवयवांची उपलब्धता न झाल्यामुळे मृत्यूमुखी पडतात. त्यापैकी २ लाख लोकांचा मृत्यू लिव्हर न मिळाल्याने होतो.

एक व्यक्ती आपले अवयवदान करून एकाच वेळी ८ लोकांना जीवनदान देवू शकते. सध्या राज्यभरात हजारो नोंदणीकृत रूग्ण अवयव मिळण्याच्या प्रतिक्षेत असून ही संख्या वाढतच आहे. शरीरातील अवयवांना कुठलाही धर्म, जात नसते. एका धर्माची व्यक्ती दुसऱ्या जाती धर्माच्या व्यक्तीला अवयवदान करू शकते. अशी अनेक उदाहरणे समाजासमोर आहेत.

कुणाला किडनीची गरज होती, कुणाला यकृताची तर कुणाला डोळ्यांची! एकमेकांना अवयवदान करताना त्यांनी फक्त माणुसकी पाहिली! अशी हजारो उदाहरणे आहेत. अवयव प्रत्यारोपण करून ते आपले पुढील आयुष्य सुखा-समाधानाने जगत आहेत.

अवयवदान एक चळवळ म्हणून उभी राहत आहे. लोकांना या दानाचे महत्त्व कळू लागले आहे. आपले बदलते जीवन चक्र पाहता, त्याचबरोबर निसर्ग पर्यावरणातील बदल, आहारातील चटपटीत, तेलकट, खाद्य पदार्थाचा समावेश, व्यायामाचा अभाव, जंक फूडचे आकर्षण यामुळे शरीरामध्ये अनेक व्याधी निर्माण होत आहेत.

तरूण वयात अनेक अवयव निकामी होत आहेत. मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार, किडनी आजार, यकृतात बिघाड अशा तक्रारी मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. काही आजार असे आहेत की, त्याचे उशीरा निदान होते. जेथे लवकर उपचार करायला हवे तेथे खूप उशीर झालेला असतो.

बऱ्याचदा उपचाराची माहिती नसणे, डॉक्टरांची सोय नसणे, आर्थिक अडचण यामुळे रुग्ण दगावण्याची शक्यता असते. म्हणूनच वेळीच निदान झाले तर अवयव प्रत्यारोपण करून आपले आयुष्य आपण सुखाने, आनंदाने अधिक काळ जगू शकतो!

अवयवदान कुणीही करू शकते. आपल्याकडे अनेक उदाहरणे आहेत. मुलाने वडिलांना किडनी दिली. बहिणीने भावाला दिली. मुलाने वडिलांना यकृत दिले. तर फ्राँन्सिसच्या हृदयामुळे हरिप्रसादला जीवनदान मिळाल्याचे ऐकतो. कुठे ऋषिकेशच्या किडनीमुळे इब्राहिमचे आयुष्य फुलले अशा बातम्या वाचतो. अवयवदानाला ना जात आडवी येते ना धर्म! म्हणूनच अवयवदान हे जात-धर्मापेक्षा सर्वश्रेष्ठ आहे.

अवयवदानाची प्रक्रिया सोपी आहे. अवयवदानाचा फॉर्म भरला असेल तर, एखादी व्यक्ती मृत्यू पावल्यास, किंवा एखादा ब्रेनडेड झाल्यास नातेवाईकांच्या इच्छेनुसार सहा तासाच्या आत अवयवदान करता येते. किमान तीन वर्षे ते अधिक वयाच्या व्यक्तीचे अवयवदान केले जाऊ शकते. म्हणूनच आपल्या मृत्यूनंतर दुसऱ्यांसाठी अवयवदान करुन त्यांचे जीवन समृद्ध करूया. अवयवदानाचा फॉर्म भरुया!

ही अवयवदानाची प्रक्रिया आता कायद्यामुळे अधिक सुरक्षित झाली आहे. मानवी उपचाराकरिता तसेच मानवी अवयवांची व्यावसायिक विक्री होऊ नये म्हणून मानवी अवयव काढणे, जतन करणे, प्रत्यारोपण करणे यासाठी केंद्र सरकारने मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा १९९४ लागू केला आहे.

तुम्ही दिलेला अवयव एका व्यक्तीचे नाही तर अनेक व्यक्तींचे जीवन बदलू शकतो. त्यांच्या जीवनात आनंद आणू शकतो. १३ ऑगस्ट रोजीच्या जागतिक अवयवदान दिनानिमिताने आपण सर्व जण मिळून सर्व लोकांमध्ये अवयवदानाबाबत जनजागृती कशी करता येईल, यासाठी प्रयत्न करूया आणि अनेकांना नवीन जीवन मिळवून देऊया.

मृत्यूनंतर कुणाचे तरी जीवन फुलवूया! असा जर विचार मनात आणला तर समाजातील हजारो नागरिक या अवयवदान अभियानात स्वतःहून सहभागी होतील. अवयवदानाचा अर्ज भरतील यात शंका वाटत नाही.

# देशात नेमकं चाललयं तरी काय?

आपण नेहमी पहातो की बदलत्या हवामानामुळे उत्तराखंड सारख्या अनेक भागांत दरवर्षी महाप्रलयाची स्थिती निर्माण होत असते. ज्या ठिकाणी पर्यटक आपली हजेरी लावुन सरकारची तिजोरी भरत असते. बिहार सारखे अनेक राज्य असे आहेत की तेही पावसाळ्यात जलमग्न होतात व अनेकांचा बळी जातो.

देशात २८ राज्ये व ८ केंद्र शासित प्रदेश आहेत. या प्रत्येक राज्यात लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी आणि सरकारी यंत्रणा आहे.परंतु आजही प्रत्येक राज्यात काही जिल्हे असेही आहेत की त्या ठिकाणी मुलभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणात अभाव दिसून येतो. आजही अनेक गावांमध्ये पुलांची व्यवस्था नाही अशा परिस्थितीत ग्रामस्थ व विद्यार्थी आपला जीव धोक्यात टाकून तारेवरची कसरत करतात व आपले काम पुर्ण करतात.

अशा अनेक मुलभूत गोष्टींकडे सरकार, पक्ष-विपक्ष जातीने लक्ष न देता व अशा महत्वपूर्ण मुद्द्यांवर चर्चा न करता राजकीय डावपेचांच्या चर्चा करून संसदेचा वेळ वाया घालवितात हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल. आज महागाई विकोपाला जाऊन पोहोचली, अनेक राज्यांमध्ये आजही कुपोषणाची परिस्थिती आहे यावर कोणीच चर्चा करण्यास तयार नाही, शिक्षण अत्यंत महागडे झाले आहे यावरही चर्चा करण्यास कोणी तयार नाही, टेरिफ युद्धामुळे सर्वसामान्य व गरीब यांच्यावर भार पडत आहेत, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां अजून पर्यंत थांबलेल्या नाहीत, बेरोजगारी वाढतच आहे.



रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार, नागपूर.
९९२१६९०७७९

नवीन धोरणानुसार कंत्राटी पद्धतीने भरतीला सुरूवात केली आहे, निवृत्त कर्मचाऱ्यांना पुन्हा पाच वर्षापर्यंत काम करण्याची संधी सरकार देत आहे आणि राजकीय पुढारी दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे. या संपूर्ण गोष्टींमुळे मुलभूत सुविधां, शेतकऱ्यांच्या समस्या, बेरोजगारी व महागाई यावर अजून पर्यंत अंकुश लागू शकला नाही. कारण संसदेत पक्ष-विपक्ष जास्तीत जास्त फक्त राजकारणावरच चर्चा करतांना दिसतात . सरकारने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. देशातील मुलभूत सुविधांकडे लक्ष दिले पाहिजे.

आज सर्वच क्षेत्रात अत्याधुनिक सुविधा मोठ्या प्रमाणात आहेत. रस्त्यांचे जाळे संपूर्ण भारतात विनल्या गेले आहे. परंतु या संपूर्ण सुविधांवर पावसाळ्यात पाणी फेरल्या जाते व अनेक भाग जलमग्न होतांना आपण पहातो व याचा परिणाम देशातील गरीब व सर्वसामान्यांना भोगावे लागतात.

आज आपण जगाच्या दृष्टीकोनातून विचार केला तर धार्मिक स्थळी चेंगराचेंगरी प्रमाण भारतात मोठ्या प्रमाणात वाढले आहे यावर आपण अजून पर्यंत नियंत्रण ठेवू शकलो नाही किंवा यावर संसदेत चर्चा होत नाही. अशा अनेक भयावह घटना डोळ्यासमोर होत आहे. परंतु पक्ष विपक्ष फक्त आपली राजकीय पोळी शेकण्यासाठी लिपापोती करतात व सर्वसामान्यांना वाऱ्यावर सोडून देतात.

केंद्र सरकार व राज्य सरकार यांना कल्पना असते की पावसाळ्यात अती दुर्गम भागात किंवा पहाडी भागात ढगफुटी, पहाड कोसळने किंवा नद्यांना महापुर येणे अशा अनेक भयावह घटना होतात अशा परिस्थितीत केंद्र व राज्य सरकारे समन्वय साधून वेळेच्या आधीच नागरिकांना हलविने किंवा धोकादायक स्थळावरील पर्यटकांवर पुर्णतः बंदी घालणे अशा कठोर उपाययोजना का केल्या जात नाहीत?

देशातील अनेक राज्यांमध्ये ढगफुटीच्या घटनेमुळे डोंगराच्या पायथ्याशी असलेली गावे जमीनदोस्त झालीत व मोठ्या प्रमाणात प्राणहानी सुध्दा झाली आणि आताही होत आहे याचे जिवंत उदाहरण ५ ऑगस्ट रोजी उत्तराखंडच्या पर्वतीय भागातील उत्तरकाशीमध्ये ढगफुटीचा मोठा तडाखा बसला असुन गंगोत्री मार्गावरील धराली गावांमध्ये पुराचे पाणी शिरल्याने हाहाकार माजला. या घटनेत ४ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण अजूनही ढिगाऱ्याखाली दबले आहेत व त्यांची घरे सुध्दा जमीनदोस्त झाली आहे.

अशा घटनांकडे राज्य सरकार व केंद्र सरकारने अलर्ट रहाने गरजेचे आहे. कारण बदलत्या हवामानामुळे सुनामी, ढगफुटी, ग्लेशियर वितळ्ने,भुस्कखलन, भुकंप, अती पाऊस, अती उष्णता, समुद्राची पातळी वाढने अशा अनेक भयावह व अंगावर शहारे येणाऱ्या घटना दिवसेंदिवस वाढण्याची दाट शक्यता आहे. परंतु ज्या दुर्घटनांपासुन आपण मानवजातीला वाचवु शकतो व वाचवण्यासाठी पुर्वतयारी करू शकतो अशा घटनांवर सरकारचे नियंत्रण असने अत्यंत गरजेचे आहे.

नैसर्गिक आपदा कधीच सांगुन येत नाही त्यामुळे ती केंव्हा भयानक रूप धारण करेल याची आपण कल्पना सुद्धा करू शकत नाही.त्यामुळे संपुर्ण राज्य सरकारांनी पर्यटकांना व धोकादायक स्थळावरील लोकांना सतर्क करून त्यांना महाप्रलयच्या आधीच हलविले पाहिजे जेणेकरून जीवित हानी व वित्तीय हानी रोखण्यास मदत होईल.

••••

# ध्वजसंहितेचे पालन करून घरोघरी तिरंगा फडकवावा!

यावर्षी आपण ७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा करीत आहोत. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला इंग्रजांच्या गुलामीतून स्वातंत्र्य मिळाले त्या घटनेला आज ७८ वर्ष पूर्ण झाली आहेत.

अर्थात हे स्वातंत्र्य आपल्याला सहजासहजी मिळाले नाही हे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली कित्येकांना तुरुंगवास भोगावा लागला. हजारो, लाखो क्रांतिकरांकांच्या, स्वातंत्र्य सैनिकांच्या त्यागातून आपल्याला हे स्वातंत्र्य मिळाले आहे.

या हजारो, लाखो ज्ञात- अज्ञात क्रांतिकारकांच्या, स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्याची ओळख आजच्या पिढीला व्हावी व त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन आजच्या तरुण पिढीनेही देशकायार्साठी पुढे यावे या उद्देशाने देशभर स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उत्साहात साजरा करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रमांतर्गत अनेक उपक्रमांचे आयोजन सरकारने केले आहे त्याचाच एक भाग म्हणून आजपासून म्हणजे १३ ऑगस्ट पासून १५ ऑगस्ट पर्यंत घरोघरी तिरंगा हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

या उपक्रमाअंतर्गत भारताच्या ध्वज संहितेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून भारताच्या नागरिकांना आपल्या घरी ध्वज फडकविण्याची परवानगी देण्यात आली. या दिवशी देशातील नागरिकांनी आपल्या घरावर तिरंगा ध्वज अभिमानाने फडकवावा असे आव्हान सरकारतर्फे करण्यात आले आहे.

घरोघरी तिरंगा या उपक्रमाची जनजागृती व्हावी यासाठी देशभर विविध कार्यक्रम चालू आहेत. तिरंगा हा आपला राष्ट्रध्वज आहे. देशाचे मानचिन्ह म्हणजे तिरंगा. स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन या सारख्या राष्ट्रीय सणांच्या दिवशी तिरंगा अभिमानाने फडकावून तिरंग्याला मानवंदना देणे हे आपले कर्तव्यच आहे.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

१३, १४ आणि १५ या तीन दिवशी सर्व नागरिकांनी आपल्या घरावर तिरंगा अभिमानाने फडकवावा आणि तिरंग्याला मानवंदना द्यावी.

घरोघरी तिरंगा फडकवताना ध्वज संहितेचे काटेकोरपणे पालन करावे. ध्वज फडकवताना ध्वजाचा कुठल्याही प्रकारे अवमान होणार नाही याची काळजी नागरिकांनी घ्यावी. पूर्वी ध्वज तयार करण्यासाठी हाताने विणलेले किंवा कातलेले कापड वापरले जाई .

आता यंत्रावर तयार केलेले कापड देखील तयार करण्यास परवानगी देण्यात आली आहे मात्र हा कापडी तिरंगा ध्वज, चुरगळलेला, फाटलेला, किंवा खराब झालेला नसावा. ध्वज फडकवताना केशरी रंग वरच असावा कोणत्याही परिस्थितीत तो तळाशी राहणार नाही याची काळजी घ्यावी.

तिरंगा ध्वज फडकवताना तिरंग्यापेक्षा जास्त उंचीवर किंवा शेजारी दुसरा कोणताही ध्वज फडकवू नये. एकाच ध्वजारोहणाच्या खांबावरती तिरंग्या सोबत दुसरा कोणताही ध्वज फडकवू नये. तिरंगा उंचावरच फडकावा. तिरंगा फडकवल्यानंतर तो खाली पडणार नाही याची काळजी घ्यावी.

ध्वज उतरवताना देखील ध्वज संहितेचा मान राखावा. सन्मानपूर्वक ध्वज उतरावा. कुठल्याही परिस्थितीत तिरंग्याचा अवमान होणार नाही याची काळजी नागरिकांनी घ्यावी कारण तिरंगा हे आपले राष्ट्रीय प्रतीक आहे तिरंग्याला अपमान म्हणजे देशाचा अपमान.

१५ ऑगस्ट नंतर तिरंगा ध्वज व्यवस्थित घडी घालून सन्मानपूर्वक ठेवावा. ध्वज संहितेच्या नियमांचे पालन करून प्रत्येकाने आपल्या घरावर डौलाने तिरंगा फडकवावा व घरोघरी तिरंगा हा उपक्रम यशस्वी करावा. जयहिंद ! जयभारत!!

• • •

## शेतकरी व्यथा

किंमत उरली नाही पाय माणसाले मातीची,
कवडीमोल गेली गा गोनी कांद्या टमाट्याची.

लेकरू रोज मागते घेऊन दप्तर शाळेसाठी,
उरलं नाही काहीच देऊन रोजी मजुरांची.

उसनवारी उरात, डोळा बायका पोरांचे हाल,
दिवसा भेव वाटते राजा नाही भीती रात्रीची.

शेतमालाले सोडून आहे सगळं महाग येथी,
परवडत नाही दोस्ता जिंदगी कास्तकाराची.

नावाचा बळीराजा खरा आहो मी भिखारी,
किराण्यापासून कृषी केंद्रात नोंद उधारीची.

ऊन वारा सोसून मी पेरलं बियाणं वावरांत,
यंदा पावसानं केली माती साऱ्या पिकाची.

सांग सोबत्या वाहून गेलं पुरात माझं सारं,
ह्या जन्मी तरी उघडल का झोप शासनाची.

• सौ. आश्विनी डकरे
चांदुर बाजार, अमरावती.

# राष्ट्रध्वजाचा सन्मान राखूया!

स्वातंत्र्य दिन अगदी तोंडावर आल्याने सर्वत्र वातावरण तिरंगामय होऊ लागले आहे. कागदी आणि कापडी ध्वज बाजारात विक्रीसाठी आले आहेत. सरकारच्या वतीने 'हर घर तिरंगा मोहीम' राबवली जात असल्याने घरोघरी त्यादृष्टीने सिद्धता सुरु झाली आहे.

कपड्यांच्या दुकानांचे डिस्प्ले तिरंगी कापडांनी सजू लागले आहेत. अन्य दुकानेही आपले देशाप्रतीचे प्रेम दर्शवण्यासाठी आणि ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी राष्ट्रध्वजाच्या रंगांचा वापर करून दुकानाबाहेर सजावट करू लागले आहेत. सामाजिक माध्यमांवर देशप्रेमाचे स्टेटस आतापासूनच झळकू लागले आहेत.

अनेक कार्पोरेट कंपन्यांनी कार्यालयीन कर्मचाऱ्यांसाठी गुरुवारी तिरंगा रंगांची अथवा पारंपरिक पोषाखाची थीम ठेवली आहे. अनेक सामाजिक संस्था आणि मंडळांमध्ये, शाळा महाविद्यालयांमध्ये स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, त्याची सिद्धताही सध्या जोमाने सुरु आहे.

ऑनलाईन शॉपिंग संकेतस्थळांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त उत्पादनांवर विशेष सवलत ठेवली आहे. हिंदी मराठी चॅनल्सवरील डेली सोप आणि रिॲलिटी शोजमध्ये सुद्धा सध्या प्रजासत्ताक दिनाचाच फिवर आहे. मिठाईच्या आणि केक्सच्या दुकानांत तिरंग्याच्या रंगाच्या विविध मिठाया आणि केक्स विक्रीसाठी आले आहेत.

सारे वातावरण देशभक्तीने जणू न्हाऊन निघत आहे. दरवर्षी तरी प्रजासत्ताक दिन आणि स्वातंत्र्य दिन जवळ आला कि देशभरात देशप्रेमाचे वारे जोराने वाहू लागतात.

बाजारात मिळणारा ५-१० रुपयांत मिळणारा राष्ट्रध्वज खरेदी करणे सोपे आहे; मात्र त्याचा योग्य तो सन्मान राखण्याची भावना आपल्यात निर्माण झाली आहे का हे अभ्यासनेही आज गरजेचे बनले आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या एका पिढीने अपरिमित हालअपेष्टा सहन केल्या; मात्र त्यानंतरच्या पिढीने पुढच्या पिढीवर जे देशप्रेमाचे संस्कार करायला हवे होते ते न केल्याने स्वातंत्र्याचे मोल आजच्या पिढीला तितकेसे उरलेले नाही.

राष्ट्रीय सणांच्या निमित्ताने रस्त्यावर पडलेले ध्वज आणि ध्वजांचे अवशेष गोळा करून त्यांची ध्वजसंहितेनुसार योग्य ती विल्हेवाट लावण्याचे काम काही स्वयंसेवी संघटना दरवर्षी करत असतात. मात्र त्यांच्यावर ही वेळ येऊच न देण्याची जबाबदारी आपली नव्हे काय?

स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी आपले राष्ट्रप्रेम दाखवण्यासाठी राष्ट्रध्वजाचे बॅज आपण छातीवर लावून मिरवतो. गाड्यांवर, घरांवर, दुकानांवर ध्वज फडकावतो, कागदी ध्वज विकत घेऊन ते पाल्यांना देतो;

मात्र ते फाटतात, हरवतात तेव्हा ' जाऊ दे, १० रुपयांचा तर झेंडा होता' असे विचार आपल्या मनात येतात आणि आपण ते शोधायचा प्रयत्नही करत नाही. या दिवशी रस्त्यावरून जाताना एखादा ध्वज रस्त्यावर पडलेला दिसला तर तो उचलून खिशात ठेवण्याचा विचार तर येतो मात्र आजूबाजूचे लोक काय म्हणतील या विचाराने आपण तसे करण्याचे टाळतो.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

खरेदी केलेले ध्वज पुढील राष्ट्रीय सणासाठी जपून ठेवतो का किंवा ते फाटले असतील तर ध्वजसंहितेनुसार त्या ध्वजांची विल्हेवाट लावतो का? आपल्या मनात आपल्या राष्ट्रध्वजाविषयी आस्था किती आहे हे जाणून घेण्यासाठी सदर उदाहरणे पुरेशी आहेत. राष्ट्रध्वजाचा सन्मान राखण्यासंदर्भात शासनाच्या वतीने प्रतिवर्षी ध्वजसंहिता प्रकाशित करण्यात येते मात्र ती वाचण्याची तसदी आपण कधी घेत नाही.

राष्ट्रध्वज हे देशाच्या सन्मानाचे प्रतीक असते त्यामुळे त्याचा योग्य तो मान राखणे आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

राष्ट्रध्वजाच्या सन्मानासाठी शेकडो क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, घरादाराची राखरांगोळी केली, आयुष्यभर कारावास भोगला. त्यांच्याच बलिदानामुळे आज आपण स्वातंत्र्यात सुखाने जगत आहोत. लोकशाही व्यवस्थेच्या सुख सुविधा उपभोगत आहोत.

राष्ट्रध्वजाच्या सन्मानासाठी आजही आपले सैनिक सीमेवर ऊन, वारा, पाऊस कशाचीच तमा न बाळगता खंबीरपणे उभे असतात त्या राष्ट्रध्वजाचे उचित मूल्य आपल्या अंतर्मनात बिंबायला हवे. राष्ट्रीय सणांच्या दुसऱ्या दिवशी जेव्हा एकही राष्ट्रध्वज रस्त्यावर इतस्ततः पडलेला दिसणार नाही तेव्हाच आपल्यातील राष्ट्रध्वजा विषयीची अस्मिता जागृत झाली असे म्हणता येईल.

